म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २२७७५

# मला भेट हवी हो!

IRBK-0122445

वाचनालय नाशिक
२२००५
२२।७।८८

स. वा. ना. सार्व. वाचनालय नाशिक.
क्र. २२००५ नों दि. २२।७।८८
वि. नाटक

# मला भेट हवी हो !

(सौ. रोहिणी कुलकर्णीलिखित
'भेट' या कादंबरीवर आधारित)

लेखक
**शं. ना. नवरे**

IRBK-0122445

मॅजेस्टिक
प्रकाशन

मला भेट हवी हो !
पहिली आवृत्ती : नोव्हेंबर, १९८७

© अंजली शं. नवरे

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : २० रुपये

नाट्य परीक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या नाटकाला प्रमाणपत्र क्रमांक डीआरएम १२७७/८६, दि. १७–११–८६ अन्वये मंजुरी दिली आहे.

मराठी रंगभूमीवरला अनभिषिक्त राजा,
माझ्या 'सुरुंग' मधला 'महेश'
'गुंतता हृदय हे' मधला 'बाबुल'
'वर्षाव' मधला 'मी'
आणि आमच्या कुटुंबाचा मित्र
**काशिनाथ घाणेकर**
याच्या पवित्र स्मृतीस
आदरपूर्वक अर्पण.

**शन्ना**



# भेटण्यापूर्वी —

मंत्रालयातला माझा स्नेही सदानंद रोडे याने मला 'मौज' ८५ च्या दिवाळी अंकातली सौ. रोहिणी कुलकर्णी यांची 'भेट' कादंबरी वाचायची शिफारस केली. त्याच्या चोखंदळपणावर माझा विश्वास. मी लगेच ती कादंबरी वाचून काढली. मला ती खूप आवडली.

एकदा सहज बोलताना 'अभिजात' संस्थेचे निर्माते आणि माझे मित्र अनंत काणे यांच्याजवळ मी या कादंबरीचा उल्लेख केला. त्यांच्या व्यवसायात आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कामात त्यांना हा उल्लेख आठवेल किंवा ही कादंबरी ते वाचतील असे मला चुकूनही वाटले नाही.

दोनएक आठवड्यांनी काणे म्हणाले, "आपल्या 'अभिजात' तर्फे या कादंबरी-वर नाटक काढण्याचं मी नक्की केलंय्. रावतेंनाही कादंबरी आवडली आहे. रोहिणी-बाईंचा पत्ता मिळवून त्यांच्याशी माझा पत्रव्यवहारही झाला आहे. 'सुधा' च्या मुख्य भूमिकेसाठी आशा काळे...."

मी ऐकतच राहिलो !

मग मी अनेक अडचणी सांगितल्या. पण काण्यांनी सारे काही निश्चित ठरवलेले होते.

संस्थेचा आणि माझा एक तपाहून अधिक संबंध. संस्थेच्या आग्रहापायीच हे नाटक लिहून झाले. रंगभूमीवर आले. रसिकांना आवडले आणि आता ते पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे.

प्रथम आभार मानायचे ते सौ. रोहिणी कुलकर्णी यांचे. त्यांनी 'अभिजात' वर विश्वास ठेवून आपल्या कादंबरीवर नाटक लिहायला संमती दिली, नाटकासाठी म्हणून काही फेरफार करायला परवानगी दिली, यासाठी. नाटकाच्या यशाचे बव्हंशी श्रेय त्यांचेच आहे.

आणखी आभार मानायचे ते सदानंद रोडे, अनंत काणे, दिग्दर्शक नंदकुमार रावते, 'अभिजात' चे एकूण एक कलावंत, रसिक प्रेक्षक आणि हे नाटक पुस्तक-रूपाने प्रकाशित करणारे मॅजेस्टिक प्रकाशनचे अशोक कोठावळे यांचे.

रसिक प्रेक्षकांचे असेच प्रेम मला लाभत राहावे.

'पूर्णायन,' डोंबिवली (प.) —शं. ना. नवरे

'मला भेट हवी हो' या नाटकाचा प्रथम प्रयोग 'अभिजात, मुंबई या संस्थेतर्फे मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई येथे शनिवार, दिनांक २२ नोव्हेंबर ८६ रोजी सायंकाळी ७ वाजता सादर करण्यात आला. त्या प्रयोगात भाग घेतलेले कलावंत. :

| | |
|---|---|
| **सुलू :** | वृषाली गावडे |
| **आजी :** | सौ. मालती पेंढारकर |
| **माणिक :** | सौ. राधिका राव |
| **आनंद :** | सुमित राघवन् |
| **भाऊ :** | सतीश रणदिवे |
| **कमा :** | सौ. सीमा पोंक्षे |
| **पमा :** | विक्रम खोटे |
| **कल्पना :** | राजश्री पिंगळे |
| **सुधा :** | आशा काळे |
| **सतीश :** | श्याम पोंक्षे |
| **अण्णा :** | मोहन कोठीवान |
| **आई :** | सौ. सुहासिनी आडारकर |

| | | | |
|---|---|---|---|
| **दिग्दर्शक :** | नंदकुमार रावते | **नेपथ्य व प्रकाशयोजना :** | बाबा पार्सेकर |
| **पार्श्वसंगीत :** | अरविंद मयेकर | **नेपथ्य साहाय्य :** | दत्तू मेस्त्री |
| **प्रकाशसंयोजन :** | रामचंद्र कोंडुरकर | **रंगभूषा :** | जयंत बापट |
| **ध्वनिसंकेत :** | प्रकाश सावंत | **निर्मितीप्रमुख :** | विजय पितळे |
| **निर्मितीव्यवस्था :** | दादा गोडकर | **प्रयोगव्यवस्था :** | जयवंत मुळीक |

**रंगमंचव्यवस्था :** वसंत पाल्कर, गजानान निकम, बाजीराव भांडारे, प्रकाश तेली

**निर्माता :** अनंत काणे

### महत्त्वाची जाणीव

या नाटकाचे पुनर्मुद्रण, प्रयोग, रूपांतर इत्य दि सर्वाधिकार सौ. अंजली नवरे, 'पूर्णायन,' डोंबिवली (प.) ४२१ २०२ यांच्याकडे आहेत. तालमी सुरू करण्य पूर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास नैबंधिक इलाज केला जाईल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 22705 नों. दि 22/11/88
वि. ना2.6 क्र.

सौ. रोहिणी कुलकर्णीलिखित
' भेट ' या कादंबरीवर आधारित

# मला भेट हवी हो !

मः ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा: क्र: २२३७५ नों. दि २४।५।८८
वि: नाटक

# अंक पहिला

## दृश्य पहिले

[ नागपुरातील भाऊंचे घर. वेळ : संध्याकाळची. घरात गडबड चालल्यासारखी माणसांची बोलणी, हसणी. बाहेरून सुलू येते. बारातेरा वर्षांची. हातात एक जुने जाडे पुस्तक. ]

सुलू : ( आत येताना ) आंद्या...ए आंद्या...
( आजी बाहेर येतात )

आजी : कोण ग ?

सुलू : मी माईची सुलू, आजी.

आजी : ये. शहाणी माझी नात ती ! ( तिला जवळ घेत ) काय ग ?

सुलू : आंद्या आहे घरात ?

आजी : शहाणे, चांगलं सोन्यासारखं नाव असताना ' आंद्या–आंद्या ' काय म्हणतेस ग त्याला ? ' आनंदा ' म्हणायला काय कष्ट पडतात जिभेला ?

सुलू : सगळेच म्हणतात म्हणून मी पण...

आजी : ते सगळे मोठे आहेत, कळलं ? म्हणे, सगळेच म्हणतात म्हणून. पुन्हा म्हण तर खरी त्याला ' आंद्या ', धपाटाच ठेवून देईन तुझ्या पाठीवर.

सुलू : माफ करून घे आजी. आनंदा आहे ना घरात ?

आजी : आत्ता एवढ्यातच आलाय् ग्राउंडवरून. ( तिला बसवत ) अग, आजीशी चार शब्द तरी बोलशील ?...माई काय म्हणतेय् ? लग्नाला जायची तयारी चालली असेल ना तिची ?

सुलू : जोरात ! इंदूरला जायचं म्हणून बाबांनी माईसाठी एक टॉपपैकी साडी आणलीय आणि मला एक सिल्कचा फ्रॉक आणि पंजाबी ड्रेस !

आजी : म्हणजे मजाच आहे तुझी !.. आनंदाकडे काय एवढं काम निघालंय् तुझं ?

सुलू : त्याला हे पुस्तक हवं होतं ते आणलंय् द्यायला आजी, माई म्हणत होती, तू आणि आंद्या— आपलं, तू आणि आनंदा लग्नाला येणार नाही आहात

म्हणून. खरं का ग ? पण शांतीमावशीला वाईट नाही का वाटणार ?

आजी : वाटणारच की ! आता तुमच्या घरी काही कार्य निघालं आणि मी आले नाही तर माईला नाही का वाईट वाटणार ? माईसारखी शांती पण मुलगीच ना माझी ? आधीच मला टोचत असते, आपल्यापेक्षा माईच तुझी लाडकी म्हणून.

सुलू : मग चल की तू लग्नाला !

आजी : आणि आनंदाला काय एकट्याला इथंच ठेवायचं ?

सुलू : त्यालासुद्धा घेऊन जायचं !

आजी : त्याची म्हणे क्रिकेटची मॅच आहे मोठ्या शाळेबरोबर. मी एकटीनं त्याचं मन वळवून काय होणार ? तुझा भाऊमामा आणि कमामामी— तो म्हणेल त्याला मान डोलावतात. 'येत नसशील तर नको येऊस बाबा' म्हणाली दोघं. मग त्याच्या सोबतीला आजीनं राहाणं भाग आलं की नाही ?

सुलू : वेडाच आहे ! मस्तपकी आपल्या साऱ्यांबरोबर इंदूरला चलायचं तर कसली फुसकी मॅच घेऊन बसलाय् ?

(हे बोलणे चालू असतानाच आतून माणिक येते. वाटीत शेंगदाणे खात.)

माणिक : म्हटलं बोलता बोलता आजीबाई बाहेर कुठं पळाल्या ? (दाणे खात) भाऊकडे मिक्सर नाही का दाण्याचं कूट करायला ?

आजी : नाही. आम्ही साधी माणसं. तुम्ही काय ? तोंडातसुद्धा मिक्सर ठेवाल दाणे चावायला.

माणिक : (हसते) ही कोण ?

आजी : माईची मुलगी.

माणिक : एवढीशी असताना पाहिली होती. नाव काय ग तुझं ?

सुलू : सुलक्षणा !

माणिक : केवढं मोठं नाव ग हे ? मला नाही बाई अशी मोठी नावं आवडत !

सुलू : (आजीला, हळूच) या कोण ग, आजी ?

माणिक : तुझी मावशी हो मी. म्हणजे मावसमावशी. माईला सांग, इंदूरची माणिक-मावशी भेटली होती म्हणून. तिच्या बरोब्बर लक्षात येईल.

सुलू : तुम्ही आमच्या शांतीमावशीला ओळखता, इंदूरच्या ?

माणिक : म्हणजे काय ? तिची आणि माझी खूपच मैत्री आहे. आमच्या बंगल्यापासून दहा मिनिटांवरच तिचं घर आहे. (आजीना) माईला मुलगा नाहीच ना ? मुलीच ना दोघी ?

आजी : हं.

माणिक : बिच्चारी ! असता एकादा मुलगा तर बरं झालं असतं. ह्या मुली काय ? लग्न होऊन सासरी जाणाऱ्या...माईचे बाळासाहेब अजून पोस्टातच आहेत ना ? पोस्टात काय पगार असणार ? हे तेव्हा त्यांना चांगली प्रायव्हेट फर्म-मध्ये सर्व्हिस देत होते. पण नाही ऐकलं.

आजी : माणिक, हे सारं देवानं ठरवलेलं असतं. मुलंबाळं, नोकरी-चाकरी...लहान पोरांसमोर तुला कशाला ग हव्यात एवढया चौकश्या ? पदरी एकादं पोर असायला हवं होतं बघ, तुझ्या.

माणिक : म्हणजे काय झालं असतं ?

आजी : सांगूच ? लेकुरवाळ्यांचा तू दुस्वास केला नसतास रिक्कामा ! ( उठतात ) सुलू, बेटा बस तू. आनंदाला पाठवते बाहेर. ( रागाने माणिककडे बघून आत जायला वळतात. )

माणिक : रागावलीस ? अग, मी सहज बोलले.

आजी : सहज कांडी टाकली म्हटलं, तरी आग लागायची राहात नाही. ( आत जातात. )

माणिक : चुकलं माझं. झालं ? ( आत जाते. ) ( क्षणभराने आतून आनंद येतो. तेरा-चौदा वर्षांचा. )

आनंद : काय ग, सुले ?

सुलू : मी तुझ्यासाठी काय आणलं असेल, ओळख.

आनंद : ' कालिकामूर्ती 'च ना ? ( हात पुढे करतो. सुलू पुस्तक देते )

सुलू : शाळेतून मिळवली बाबा शेवटी.

आनंद : केव्हा परत करायची आहे ?

सुलू : केव्हाही कर रे. ( आत बघत ) ' कालिकामूर्ती 'चं निमित्त रे. आज मला तुला दुसरंच काही सांगायचं आहे.

आनंद : मग पटकन् सांग. फुसकं काही असेल तर मात्र बघ. मी बसलोय् क्रिकेटच्या फोटोंचा आल्बम करत. जवळजवळ सत्तरऐंशी फोटो जमवले आहेत मी.

सुलू : तू वेड्या, काय इंदूरला येत नाही आहेस मीनाताईच्या लग्नाला ?

आनंद : नाही, मॅच आहे माझी.

सुलू : मॅच गेली खड्डयात. आता ऐक मी सांगतेय् ते. तसं सांगायला कठीणच वाटतंय् ...म्हणजे तसं मलासुद्धा नीट माहीत नव्हतं

आनंद : तू चटकन् सांगतेस की मी जाऊ ?

सुलू : आंद्या, तुला माहीत आहे ? तुझी खरी आई इंदूरला असते. इथली कमा-मामी काही तुझी खरी आई नाही. ( आनंदा नर्व्हस. उगाच काहीतरी चाळा करू लागतो ) काय रे, माहीत आहे ?

आनंद : अं ? आहे. खूप आधीपासून माहीत आहे.

सुलू : ते कसं ?

आनंद : सांगता नाही येणार, पण माहीत आहे. आजी, मोठी काकी, माईआत्या यांच्या बोलण्यातून थोडं समजलं. पण तसं मला काहीच आठवत नाही. चेहरासुद्धा आठवत नाही तिचा.

सुलू : गेल्या सुट्टीत मी माईबरोबर इंदूरला गेले होते ना, तेव्हा मी एकदा ओझ-रतं पाहिलं होतं तुझ्या आईला. माईनंच दाखवली मला.

आनंद : मग तू मला सांगितलं कसं नाहीस तेव्हा ?

सुलू : माईनं बजावलं होतं मला. तुझ्याजवळ काही बोलायचं नाही म्हणून.

आनंद : ती....ती दिसायला कशी आहे ग ?

सुलू : एकदम टॉप! जाहिरातीतल्या बाईसारखी...शप्पत! ( आनंद विचारात पडतो ) आणि तू इंदूरला यायचं नाही म्हणतो आहेस लग्नाला. अरे आलास तू इंदूरला, तर कदाचित् तुलासुद्धा दिसेल ती.

आनंद : खरंच ?

सुलू : म्हणून तर तुला सांगायला आलेय्. तू इंदूरला चल म्हणून.

आनंद : हो, पण आता येतो म्हटलं तर भाऊ-आई विचारतील.

सुलू : त्यांना सांग, मॅच कॅन्सल झालीय्.

आनंद : पण त्यांनी मला मॅचसाठी इथं राहायला एवढी कबुली दिलीय् –

सुलू : अरे, इंदूरला तू आईला भेटू नयेस म्हणूनच दिली असेल कबुली.

आनंद : अं...असेलदेखील.

( स्तब्धता )

सुलू : तुला खऱ्या आईला बघावंसं नाही वाटत ?

आनंद : चिक्कार वेळा वाटतं बघ. कधी कधी उगाचच तिची आठवणसुद्धा येते मला. आणि रडावंसं वाटतं.

सुलू : म्हणजे तिलासुद्धा येत असणार तुझी आठवण! तू वाटेल ती आयडिया काढ आणि चलच इंदूरला. हवं तर आजीला सांग. नाहीतर पमामामाला... पमामामालाच सांग. तो इंदूरला तुझी आणि तुझ्या आईची भेट देखील घालून देईल. तू लाडका आहेस ना त्याचा ? ( बाहेरून 'आनंदा' अशी भाऊंची हाक ) भाऊमामा आले वाटतं. मी पळते पटकन्.

( भाऊ येतात. ऑफिसातून आलेले. )

भाऊ : ( आनंदाला एक मासिक देत ) आनंदराव, हे घ्या. तुमच्यासाठी घेतलं मुद्दाम. यात हवे तेवढे क्रिकेटचे फोटो आहेत. ( आनंदा मासिक बघू लागतो ) काय सुलूबाई, लग्नाला येताय् ना तुम्ही इंदूरला ?

सुलू : हो. बाबांना सुट्टी पण मिळालीय्.

भाऊ : व्हेरी गुड ! आनंदा, आत जाऊन जरा आईला पाठव इकडे. म्हणावं, दोन मिनिटांचंच काम आहे.
(आनंद आत जातो.)

सुलू : आजी नाही येणार इंदूरला, भाऊमामा ?

भाऊ : कशी येणार ? आनंदाची इथं नागपुरात मॅच आहे.
(कमा येते.)

कमा : काय हो ? चहा हवाय् ?

भाऊ : चहाचं राहू दे. उद्या निघायचंय् आपल्याला. तयारी झालीय् सगळी ?

कमा : होत आलीच आहे.

भाऊ : आणि मुख्य म्हणजे पम्या येऊन गेला का ? तिकिटांचं अंगावर घेतलंय् त्यानं. पण युनियनच्या कामात अडकला की विसरून जायचा. आला नसेल तर असाच जाऊन स्टेशनवर त्याच्या मेव्हण्याला गाठून विचारतो.

कमा : दुपारीच येऊन गेले भावजी. आणि आले ते बरंच झालं. माणिकताई पण आपल्याबरोबर येताहेत, त्यांचंही तिकीट सांगितलं त्यांना.

भाऊ : उत्तम ! तिच्याशी जपूनच बोला.

कमा : हळू. आत आहेत त्या. दुपारपास्नं ठिय्या देऊन बसल्या आहेत.

सुलू : भाऊमामा, मी निघते.

कमा : जाण्याआधी आत आजीला भेटून जा. तिनं खाऊ काढून ठेवला असणार तुझ्यासाठी.
(सुलू आत जाते.)

कमा : त्या बाईच्या इतक्या चवकश्या चालल्या आहेत—

भाऊ : माणकीच्या ना ? तिला नाही पोरबाळ. कामाचा आळस. रिकामा वेळ घेऊन मोकळीच असते ती. मग ह्याची उणीदुणी काढ.... इकडची बातमी तिखटमीठ लावून तिकडे दे. हेच चाललेलं असतं तिचं.
(सुलू आणि आजी बाहेर येतात. सुलूच्या हाती डबा.)

आजी : जपून जा ग बेटा.
(सुलू बाहेर जाते.)

भाऊ : आई, येताना अधिकारींच्या महेशला सांगून आलोय्. तो रात्री येत जाईल तुमच्या सोबतीला. त्याला म्हटलं, तू आणि आनंदा बरोबरीनं अभ्यासही करा. आपल्या डॉक्टरांनासुद्धा बोलून ठेवलंय्.... तुला जरा जरी बरं वाटेनासं झालं तरी आनंदाला पाठवून त्यांना बोलावून घ्यायचं. तुझी सगळी औषधं एकत्र पेटीत ठेवली आहेत. घेण्याआधी आनंदाकडून नाव वाचून

द्यायचं औषधाचं.

( दरम्यान आतून माणिक काहीतरी खात बाहेर येते. )

माणिक : म्हटलंच, भाऊ आला असणार ! कमा बोलली की नाही तुला, मी तुमच्याबरोबर येतेय् म्हणून ?

भाऊ : आत्ता एवढयातच बोलली.

माणिक : आले नाही मीनाच्या लग्नाला तर शांती फाडून खायची मला. इंदुरात राहू द्यायची नाही आम्हाला. ( खाताना मध्येच कमाला ) कानवले छानच झाले आहेत हो कमा. प्रवासात डबा दूरच ठेव माझ्यापासून.

( हसते. )

कमा : कानवले आनंदासाठी करून ठेवलेत. त्याला भारी आवडतात. डबा इथं नागपुरीच राहाणार आहे, इंदूरला येणार नाहीए.

भाऊ : माणके, मग तू राहातेस का इथंच ? ( सगळे हसतात. )

माणिक : वा रे ! मीनाच्या लग्नासाठी माहेरपण दोन आठवडयांनी कमी केलंय् , शांतीला भिऊन. आता लग्नात तिच्याकडून नाही साडी घेतली जरीची, तर विचार ! ( आत बघत ) आंद्या एका अर्थी इंदूरला येत नाहीए ते बरंच झालंय् , नाही ?

आजी : माणके—

[ एक विलक्षण स्तब्धता. बाहेर स्कूटरचा आवाज. ]

भाऊ : पमा आलेला दिसतोय् .

( पमा आणि त्याची बायको कल्पना येतात. कल्पनेच्या हातात डबा. )

भाऊ : तुझीच वाट पाहात होतो, बापा. तिकिटांचं काय झालं ?

पमा : ते नंतर. ( हाक मारतो ) आंद्या...आंदू...

( आतून आनंद येतो. हातात कात्री )

पमा : स्टेशनवरून आम्ही काय आणलं असेल, लाडक्या पुतण्यासाठी ? ( मासिक काढून देत ) स्टॉलवरचा लेटेस्ट इश्यू. आता ती हातातली कात्री घ्या आणि चालवा प्रत्येक पानावर. वेस्ट इंडीजचे सगळे प्लेअर्स तुमच्या आल्बममध्ये चिकटवून ठेवा.

भाऊ : ( हसत ) काय रे, तुला काय वाटतं ? त्याचा बाप त्याला काय अशी मासिकं आणून देत नसेल ? मघाशीच एक अंक आणून दिलाय् त्याला. आंद्या, ' काका–काका ' करताना कधीतरी ' भाऊ–भाऊ ' करायला विसरू नकोस.

( सगळे हसतात. )

आनंद : ( मासिक चाळत ) पण पमाकाका, माझा आल्बम तर भरत आलाय्.

भाऊ : ( पमाला ) घ्या !

पमा : वो तो हमे मालूम था ! करके–( पांढऱ्या कोऱ्या कागदांचा आल्बम देत ) हा आल्बम नंबर दोन– खूष ?

कमा : आता पुन्हा ‘ काका–काका ’ चालणार हो आनंदाचं.

माणिक : तिकिटांचं काय केलं आहेस ?

पमा : ( तिकिटे भाऊंजवळ देत ) ही तिकिटं. तुम्ही लोक उगाच घाबरत होता. आणखी दहा तिकिटं मागितलीस तरी शिल्लक आहेत इंदूरची. कल्पनेलाच घेऊन गेलो होतो स्टेशनवर. म्हटलं, भावाला तूच दम दे. आमची तिकिटं देतोस की बदली करू तुझी दुसऱ्या स्टेशनला ! खालच्या पोस्टवर–असिस्टंट स्टेशनमास्तर म्हणून ? मी युनिअनचा सेक्रेटरी आहे. आमच्या सगळ्या दमबाज्या पाठ आहेत माझ्या.

कल्पना : पुरे हं. भावजी, दमबिम काही द्यावा लागला नाही भावाला. ह्यांची उगाच युनियनची फुशारकी. गाडीला मुळीच रश नाहीए. आंद्या, हा डबा तुझ्यासाठी आणलाय्.

आनंद : काय आहे त्यात ?

कल्पना : तुला आवडतात ते कानवले आहेत. ( आजीला डबा देते. )

आजी : आज काय चुरस लागली आहे का भावाभावांत ? कमानंदेखील कानवले करून ठेवलेत.

माणिक : बघू तरी तुझे कानवले कसे लागतात ते ? चाखून बघू का एकादा ?

आजी : कमासारखेच होतात ग कल्पनेचे कानवले. काही कष्ट घेऊ नकोस चाखण्याचे. ( डबा घेऊन आत जाते ).

कल्पना : शांतीवन्संच्या मनाला लागणार हं, आई लग्नाला आल्या नाहीत की.

भाऊ : पण आंद्याची मॅच तेवढयात निघालीय्.

पमा : आंद्या, मॅच कॅन्सल करून इंदूरला येतोस का बोल ?

कल्पना : म्हणजे मग आईनासुद्धा येता येईल. तिकिटं सहज मिळताहेत.

पमा : बघ आंद्या. मॅच कॅन्सल केलीस तर तुला नवी फर्स्टक्लास बॅट आणून देतो, तू म्हणशील ती. चलो, बॅट आणि पॅडस्सुद्धा. बोल, येणार लग्नाला ?

भाऊ : अरे पण—

आनंद : जायच्या आधी आणून दिलीत तर येतो मी.

पमा : ये हुई ना बात ? कळलं भाऊसाहेब ? आंद्या ‘ काका–काका ’ का करतो ते ? आंद्या, उद्या सकाळी चलायचं माझ्याबरोबर ‘ नागपूर स्पोर्टस् ’मध्ये. भाऊ, आईला म्हणावं तू तयारीला लाग तुझ्या. आम्ही आत्ताच जाऊन आणखी दीड तिकिटं काढून आणतो इंदूरची. ( कल्पनेला ) चल लौकर भावाला दम भरायला.

भाऊ : आनंदा, बघ हो...नाहीतर आधी तुझ्या टीमच्या कॅप्टनला विचारून घे... तूच म्हणत होतास ना, महत्त्वाची मॅच आहे म्हणून ?...आणि आता ऐनवेळी कसं जमेल ? मग आधी नाही का म्हणालास ? आता तुझं आणि आजीचं तिकीट कसं मिळणार ?

पमा : भाऊ, तिकिटांची काळजी करू नकोस; तिकिटं ईझीली मिळताहेत. क्रिकेटचं काय एवढं महत्त्व ?...आंद्या, आता माघार घेतलीस तर आपली कट्टी. बोल– कट्टी की बट्टी ?

आनंद : बट्टी !

पमा : ऐ, शाबास !
(पमा आणि कल्पना बाहेर जातात.)

भाऊ : या पम्याला अक्कल जरा कमीच.
(भाऊ आणि कमा नर्व्हस होऊन आत जातात.)

माणिक : तू भलताच लाडका दिसतोस काकाचा !

आनंद : मग ? आहेच मुळी !

माणिक : चला, म्हणजे तू इंदूरला येणार तर !

आनंद : मग ?

माणिक : तुझी खरी आई इंदूरला असते माहीत आहे का तुला ?

आनंद : माहीत आहे.

माणिक : ती तुला तिकडे भेटली तर ?

आनंद : तर काय ? तिला आनंद होईल. मलादेखील आनंद होईल.

माणिक : तिला आणि आनंद ? (हसते) तिनं दुसरं लग्न केलंय् तुला माहीत आहे ? (आनंद रडवेला) नाही ना ? ती मस्तपैकी रमलीय् तिकडे आपल्या नव्या संसारात. इंदूरला. साकेत नगरमध्ये नवीन जागा काय, पैसा काय, दुसऱ्या नवऱ्याबरोबर स्कूटरनं सारखं भटकणं काय...तिला आठवणदेखील नसेल तुझी.

आनंद : अं...असं कसं होईल ?

माणिक : असंच होतं अशा बायकांच्या बाबतीत. एवढ्यातेवढ्या भांडणावरून घटस्फोट घेणारी बाई ती आणि असं सांग, तिच्या दुसऱ्या नवऱ्याला चालेल ? आपली बायको पहिल्या नवऱ्याच्या मुलाला भेटली तर ?...त्याला तर मुळीच आवडणार नाही. मी ओळखते ना त्याला चांगली. बायकोला तो दम भरायला कमी करणार नाही. नवी भांडणं चालू होतील त्यांच्या संसारात...यायचं तर ये बापा तू इंदूरला, काका एवढं म्हणतोय तर. पण शहाणा असशील तर खऱ्या आईला मुळीच भेटू नकोस. (आनंदाच्या

डोळ्यात पाणी जमलेले ) तिनं पोटच्या पोराला पार विसरायचं आणि आपण मात्र तिची आठवण काढायची. कशासाठी म्हणून म्हणते मी ? तू सुद्धा विसर तिला. अशा बाईला असाच धडा शिकवायला हवा !

[ आनंद संभ्रमात पडतो.
त्याला त्याचे आणि सुलूचे बोलणे आठवू लागते. ]

सुलू : तुला खऱ्या आईला बघावंसं–भेटावंसं नाही वाटत ?

आनंद : चिक्कार वेळा वाटतं बघ. कधीकधी उगाचच तिची आठवणसुद्धा येते मला. आणि रडावंसंच वाटतं.

सुलू : म्हणजे तिलासुद्धा येत असणार तुझी आठवण ! नसेल येत तुझी आठवण ?...तुझी आठवण ?....येणारच रे...येणारच रे... येणारच... येणारच रे...

[ काळोख ]

## दृश्य दुसरे

[ सुधाचे इंदूरचे नवे घर. वेळ : संध्याकाळची. बेल वाजते. सुधा आतून येऊन दार उघडते. दारात सतीश. ]

सुधा : इतका उशीर का ? केव्हाची वाट बघतेय् मी तुमची.

सतीश : छान ! आपण ऑफिसातून लौकर पळायचं आणि नवरा घरी आला की त्याला ' उशीर का ' म्हणून विचारायचं. अजबच न्याय आहे.

सुधा : अहो न्यायाधीश, मी पळण्यापूर्वी आपल्या बँकेत फोन केला होता बरं. तुम्ही जागेवर तरी होता ?

सतीश : मी मीटिंगला गेलो होतो. परत आल्यावर जामखेडकरनं निरोप दिला, तुमच्या मिसेस्चा फोन होता. मी मग तुझ्या ऑफिसात फोन केला, तर ' सुधा आज हाफ् डे घेऊन गेलीय् ' असं म्हणून त्या पोट्टीनं फोन दाणकन् बंद केला-

सुधा : मग ती मालती साठेच असणार. शिष्ट नाही तर!

सतीश : पण मालतीबाईंच्या शिष्टपणामुळं मला किती काळजी वाटायला लागली !

सुधा : तरी बरं, आपण कालच डॉक्टरकडे जाऊन आलो होतो ! आणि साधा विचार करायचा, तब्येत बरी नसती तर मी पुन्हा फोन केला नसता ? निदान जामखेडकरकडे तसा निरोप दिला असता.

सतीश : एक्झॅक्टली ! तोच विचार डोक्यात आला तेव्हा जरा मन स्वस्थ झालं.

सुधा : तुम्ही इथं फोन करून का नाही पाहिलंत ?

सतीश : केला ना फोन, पण नुसतीच बेल वाजत राहिली.

सुधा : बरोबर. मी स्टेशनवर गेले होते तेव्हा.

सतीश : स्टेशनवर ?

सुधा : पाहुण्यांना आणायला. त्यांचा फोन आला ऑफिसात...ओळखाल ? कोण पाहुणे आले असतील ?

सतीश : माझे सासू-सासरे ? अण्णा आणि आई ? बरोबर ओळखलं असेल तर काय बक्षीस देशील ?

सुधा : देऊ ? (त्याला जाऊन बिलगते)

सतीश : अग, घरात अण्णा-आई आहेत-

सुधा : अंऽहं. थोड्या वेळापूर्वीच दोघं कॅप्टन दिघ्यांना भेटायला गेली आहेत... पण एवढ्यात येतीलच ते. (दूर होते)
(दोघे हसतात.)

सुधा : अण्णा-आई आल्याचं कसं ओळखलंत ?

सतीश : त्यांचा कोट धडधडीत इथं आहे ना पुरावा म्हणून ! अण्णा-आईंना आपलं हे नवीन घर आवडलं ?

सुधा : खूप.

सतीश : सांगितलं नाहीस त्यांना ? नवऱ्याला दोन महिने उन्हातान्हात फिरवत होते स्वतःच्या पसंतीचं घर मिळवायला ते !

सुधा : जसे काही माझ्यासाठीच घर शोधत होता !

सतीश : तुझ्यासाठीच नसेल, पण तुझ्या आवडीचं घर तरी नक्कीच शोधत होतो आपण... च् अण्णा-आई आणखी महिन्याभरानं यायला हवे होते तोपर्यंत आपलं फर्निचर, पडदेबिडदे आले असते. आपलं घर अगदी तुझ्या मनाप्रमाणं सजवायचं ठरवलंय् मी, सुधा. विश्वास नाही ?

सुधा : नाही कसा ? तुम्ही सतीश, मला मागलं सारं विसरायला लावून इतकं सुखात ठेवलंय्-

सतीश : प्लीज, असं परक्यासारखं नाही बोलायचं.

प्र. प्र. स. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. २२७७७ नों. दि. २२।५।७८
वि. ........ नायक ... क्र. ..............



सुधा : खरंच, मनातलं सांगायला कधीकधी परक्यासारखं बोलावं लागतं का हो आपल्याच माणसाजवळ ?

सतीश : खरं म्हणजे त्याची गरज नसते !....बरं, मी आंघोळ उरकून घेऊ ? तुझ्या असल्या प्रश्नांची मला कधीच उत्तरं देता येत नाहीत.
(आत जाऊ लागतो)

सुधा : तुमचे कपडे मी आपल्या बेडरूममध्ये काढून ठेवले आहेत.
(सुधा त्याची बॅग उचलते.)

सतीश : बॅगेत तुझी औषधं आहेत ती नीट काढून घे. (आत जाताना मध्येच आठवण होऊन) सुधा, तुला मुख्य ते सांगायचं विसरलोच. आज काय कार्यक्रम ठरवलाय् माहीत आहे ? अर्थात तुझी तब्येत ठीक आहे असं धरून हं.

सुधा : काय कार्यक्रम ठरवलाय् ?

सतीश : एकदम फर्स्टक्लास आहे. अर्थात ठरवलाय् तावडेनंच आमच्या. आज आपण दोघं आणि दोन तावडे बाहेर जेवायला जायचं. तिथून मग पिक्चरला. गुरुदत्तचं 'कागज के फूल' पिक्चर आलंय् इकडे रीगलला, ते बघायला. पिक्चर इतकं ग्रेट आहे म्हणून सांगू–

सुधा : तुम्ही तरी ग्रेटच आहात ! आज कसा जमणार हा कार्यक्रम ? अण्णा–आई आजच आलेत.

सतीश : खरंच की ! (बसतो.)

सुधा : बसताय् काय ? चटकन आंघोळ संपवा, मग ठरवू...चहाबिहा काही करू का ?

सतीश : नको ! सकाळपासून इतक्यांदा झालाय्...उगाच नाही वजन वाढत आहे माझं ! सुधा, उद्यापासून तू आणि मी पहाटे उठून फिरायला जायचं. जिमखान्याला–

सुधा : चांगल्या चार राउंडस्. हे तर आपलं दर आठवड्यालाच ठरत असतं नाही का ?

सतीश : पण आता मात्र नक्की हं. अण्णा–आई बडोद्याला गेल्यानंतर लगेच मॉर्निंग वॉकला सुरुवात करू. पहाटे साडेपाचचा गजर लावायचा–

सुधा : तो बंद करून म्हणायचं, आणखी थोडा वेळ झोपतो, तोपर्यंत तू चहा करून ठेव, आणि मग साडेसात वाजेपर्यन्त घुर्रर...घुर्रर...(हसते)

सतीश : त्याचं काय होतं, सांगू ?

सुधा : नको. त्यापेक्षा आधी आंघोळीला पळा. (सतीश आत जातो)
(सुधा त्याच्या बॅगेतून औषधे काढून आत घेऊन जाते. गुणगुणते.

बेल वाजते. सुधा बाहेर येऊन दार उघडते. दारात अण्णा–आई. )

अण्णा : सतीश आले का कामावरून ?

सुधा : नुकतेच आले. आंघोळीला गेलेत.
( अण्णा–आई बसतात. आई काहीशी अस्वस्थ )

सुधा : तुला आई, दगदग झालेली दिसतेय्. आधी प्रवासाचा शीण...

आई : माझ्या फारसं मनात नव्हतंच कॅप्टनसाहेबांकडे जायचं...पाणी आणतेस, सुधा ?

अण्णा : आणि क्रोसिन्‌ची नाहीतर दुसरी कसली गोळी आणून दे त्यांना. गोळी घेऊन जरा पडल्या की बरं वाटेल. (सुधा आत जाते.) हा उन्हाचा त्रास झाला असणार. अरेच्या, छत्री तिकडेच राहिली.

आई : आता कसला त्रास आणि काय !

अण्णा : जाताना तर तुम्हाला तसा काही त्रास वाटत नव्हता.

आई : पण तिथं ती बोहचक भेटली ना ? माणकी ?

अण्णा : मला वाटलंच, तुझं आणि तिचं काहीतरी नको ते बोलणं झालं.

आई : मग सवडीनं सांगीन– धर्माच्या कर्माला कधी नाही ते यावं आणि तेव्हाच नेमकं त्यांच्या घरचं लग्न निघावं.
(सुधा गोळी, पाणी घेऊन येते. आईला देते.)

सुधा : कॅप्टनसाहेब भेटले ?

अण्णा : नाही. ते आणि वहिनी, लग्नाला गेलेत सकाळपासून. घरी फक्त त्यांचा द्वारकानाथ आणि त्याची बायको होती, माणिक.

सुधा : ती दोघं लग्नाला गेली नव्हती ते एक म्हणते, बरं झालं.

आई : गेली होती तर ? पण हातावर पाणी पडल्याक्षणी ही ढमाली घरी परतली. लगीनघरी कामं पडतील ना ? ही एक नंबरची आळशी. द्वारकानाथ तीनदा म्हणाला तेव्हा बूड हलवून चहा करायला उठली.

सुधा : ( अण्णांना ) माणिकताई काही बोलल्या का ?

अण्णा : तिच्या आणि ह्यांच्या गोष्टी चालल्या होत्या आत.

आई : तिचं काय तोंड आहे का ? कातड्याचं म्हणूनच टिकलंय्. इतकी बडबडत होती की माझं डोकं उठलं. भारीच बाई ढालगज हो.

अण्णा : येते का कधी ती तुझ्याकडे ?

सुधा : नाही. आधी आम्हाला या जागेत येऊन तर कुठं दोन महिने होताहेत. मध्ये एकदा भेटली होती मार्केटात. माझा पत्ताबित्ता विचारला आणि मग लागली काहीबाही बोलायला. मी तशी उडवाउडवीच केली.

आई : मला म्हणत होती, येऊ का तुझ्याबरोबर सुधाकडे म्हणून. म्हटलं,

अजून घर लागतंय् तिचं. त्या धावपळीत नको येऊस आत्ता. मी टाळलंच म्हण ना तिला. आलीच कधी इथं तर बेतास बातच बोल तिच्याशी.

सुधा : कल्पना आहे मला. लोकांना किती अकारण रस असतो नाही दुसऱ्यांच्या आयुष्यात ? ती माणिकताई काय आणि आजूबाजूची नात्यातली माणसं काय...सतीश खंबीर आहेत म्हणून बरं, नाहीतर मला जगणंच कठीण केलं असतं सगळ्यांनी.

( आतून सतीश शीळ घालत येतो. )

सतीश : नमस्कार. प्रवास कसा काय–ठीक झाला ?

( सुधा पाण्याचा ग्लास घेऊन आत जाते. )

अण्णा : अगदी. मला तर वाटतं, आजकाल प्रवासाचा बेत अचानक केला तरच प्रवास सुखाचा होतो...बँक काय म्हणतेय तुमची ?

सतीश : एकदम जोरात आहे. प्रमोशन्स मिळतील आता भराभर.

आई : हे घर बाकी छानच मिळालं हो तुम्हाला– आणि मुख्य म्हणजे लाभणारं ठरलंय्.

अण्णा : इथं आल्या आल्या सुधानं गोड बातमी दिली.

आई : सातवा लागला की पाठवायचं हिला बडोद्याला.

सतीश : अर्थातच. आमच्या घरचे तर दोर तुटलेच आहेत या लग्नामुळं. आता आम्हाला दोघांना सासर आणि माहेर म्हणजे तुमचंच घर की ! ( उठतो ) मी जरा बाहेर जाऊन येतोय्. (सुधा चकित. तिला) अग, तावडेला सांगून यायला हवं.

अण्णा : तावडे ?

सुधा : हो. अण्णा, यांच्या बँकेत यांचा एक मित्र आहे तावडे म्हणून. त्यानं आज जेवणाचा आणि पिक्चरचा कार्यक्रम ठरवला होता.

अण्णा : मग तो कॅन्सल करू नका आम्ही आलो म्हणून.

सतीश : छेः छेः तसा तो काही महत्त्वाचा नाहीए आणि नक्की पण झालेला नाहीए. पण तरीसुद्धा त्याला कळवलेलं बरं...सुधा, येताना बाजारातून काही आणायचंय् ?

सुधा : नाही. लौकर या हं परत.

सतीश : हो.

( निरोप घेऊन सतीश जातो. सुधा दारापर्यंत जाते. तो गेल्यावर वळते. )

सुधा : इतके समंजस आहेत सतीश ! तुम्ही आला आहात म्हणूनच ते तावडेला नाही म्हणून सांगायला गेलेत. पण तुम्हाला आणि विशेषतः मला काही

वाटू नये म्हणून बघितलंत ना, त्यांनी कसा सहज रद्द केला कार्यक्रम ?

अण्णा : पहिलं दान चुकलं, पण देवानं दुसरं दान मात्र छान दिलं. अगदी मनापासून.

आई : खरंय्. तुझ्या आयुष्याची काळजी खरंच मिटवलीय् सतीशनी.

सुधा : मला इतके जपत असतात सारखे ! त्यांनीच मला सारं सारं विसरायला लावलंय आणि चुकूनही कधी केल्या गोष्टीचा उल्लेख नसतो. माझं कधी चुकलं तर लगेच रागावणार नाहीत. सावकाशीनं मला चूक पटवून देतील.

आई : हे भाग्य तुला पहिल्या वेळीच लाभतं तर बघायला नको होतं.

अण्णा : तो विषय मनातसुद्धा आणायचा नाही. असतात काही दिवस भोगाचे. आता तर नशिबी चांगले दिवस लिहिलेले आहेत ना देवानं ? पुढल्या वर्षी घरात बाळ रांगायला लागलं की सुख कसं चढत्या क्रमानं लाभायला लागेल.

आई : हो नं.

[ स्तब्धता. ]

[ दारात माणिक येते. हातात छत्री. ]

माणिक : येऊ का ? ( सगळे तटस्थच ) अण्णांची छत्री राहिली ती घेऊन आले.

सुधा : बसा...बसा ना. हे आत्ताच बाहेर गेलेत.

माणिक : कोपऱ्यावर वळताना पाहिली ना मी स्कूटर.

आई : माणके, मी जरा आत जाऊन पडते.

अण्णा : डोकं फार दुखतंय त्यांचं. आत्ताच सुधानं गोळी दिलीय्.

माणिक : पडा जाऊन तुम्ही. झोप लागली की उतरेल डोकं. मी पाच मिनिटं सुधाशी गोष्टी करून निघतेच आहे.

आई : तीदेखील दमली आहे. दिवसभर वडवड झाली.

माणिक : ( हसत ) म्हणजे मी जायचं का ? ( बसते. )

सुधा : असं नाही हो. बसा ना. पहिल्यांदाच आला आहात.

माणिक : अण्णासाहेब, तुम्हीच सांगा हिला, मला 'अहो-जाहो' करू नकोस म्हणून. तसं काही फार अंतर नाहीए आमच्या वयात...घर बाकी झकासच मिळालंय् तुम्हाला.

सुधा : हो.

माणिक : ( पर्समधून पुडी काढत ) च्युइंगम खाणार ?

सुधा : नको.

माणिक : या घरात नवीन फर्निचर असतं ना–

सुधा : ऑर्डर दिलीय्.

माणिक : हो ! बाकी तुम्हाला काय ग ? दोघं नोकरी करताय्. उडवाल तेवढा पैसा कमी. आमच्यासारखं थोडंच आहे तुमचं ? हे आता मोठ्यातल्या मोठ्या पोस्टवर आहेत म्हणून जमतंय् एवढंच.

अण्णा : सुधा, सतीश एवढ्यात येतील हो.

माणिक : ते यायच्या आत जातेय् मी. सुधा खूप वर्षांनी अशी मोकळी भेटतेय्... ( सुधाला ) आपली पहिली ओळख म्हणजे तुझ्या लग्नात. त्या पहिल्या.

सुधा : काही लक्षात नाही.

माणिक : करेक्ट ! अशा गोष्टी विसरायच्याच असतात...तुम्हाला दोघांना बऱ्याचदा पाहाते मी स्कूटरवरून जाताना....स्कूटर कंपनीनं दिलेली असेल ना ?

अण्णा : सतीश बँकेत आहेत. बँक कशाला स्कूटर देणार ?

माणिक : ( हसत ) हो, एक वेळ कर्ज देईल स्कूटर घ्यायला.

सुधा : चहाबिहा काही घेणार ?

माणिक : छे ग. दुपारचं लग्नघरचं तेलकट जेवण अजून पचलेलं नाही....दुपारी आम्ही लग्नाला कुठं गेलो होतो माहीत आहे ? शांतीच्या मीनाचं लग्न होतं. भाऊच्या भाचीचं ग. काय पण जावई शोधलाय् ! कारकुंडा, दिसायला बावळट....बाकी मीनाला एकदम मॅच आहे हं. ( हसते. )

सुधा : मला या माहितीत मुळीच इंटरेस्ट नाहीए. मार्ग भिन्न झाले आहेत आता.

माणिक : तरी एक दुवा आहे ना !...आई, तुम्ही सुधाला काही बोलला नाहीत आमच्याकडून आल्यावर ?

सुधा : कशाबद्दल ?

माणिक : अग, लग्नाला तो इथं आलाय् , इंदुरात...तुझा मुलगा ग. आनंद. माहेरी नागपूरला गेले होते मी, तेव्हा परवा पाहिला त्याला. तसा स्मार्ट आहे... या कोपऱ्यावरल्या कम्युनिटी हॉलमध्येच उतरलंय् ! वऱ्हाड. तुझी आणि त्याची मध्ये कधी भेट झाली नसेल, नाही ?

आई : ( रागाने ) माणके –

[ स्तब्धता ]

माणिक : हिला सांगितलं म्हणजे... ( अण्णा पुढले दार उघडतात, त्याचा अर्थ समजून ) बरं, मी निघते ग. मलाही उशीरच झालाय् , उद्या फोन करून विचारीन आईच्या तब्येतीबद्दल. ( जाते. )

[ विलक्षण स्तब्धता ]

सुधा : आई, माणिकताई तुझ्याजवळ बोलल्या होत्या ना ?

आई : हो, पण मी मुद्दामच तुला बोलले नाही.

सुधा : म्हणून काय कळायचं थांबलं थोडंच ? तुझ्याकडून कळतं, तर मनाला

असा अचानक आणि इतका धक्का बसला नसता !

अण्णा : सुधा, नातंच तिथं त्यांचं, तेव्हा येणीजाणी चालायचीच. आपण इतकं हादरून कशाला जायचं ?

सुधा : आई हादरली म्हणूनच डोकं धरून बसली ना आल्यापासून ? का हादरली ती ? अण्णा, प्रश्न विचारणं सोपं आहे, तितकं उत्तर देणं सोपं नाही. आपल्या पोटचा मुलगा इतक्या वर्षांनी इथं जवळ आल्याचं कळलं. त्याच्या असंख्य आठवणींचं मोहोळ दगड मारल्यासारखं एकदम उठलं तर हादरणार नाही कुणी ? सांगा ना-

आई : त्या माणकीचं काही अडलं होतं– मुद्दाम इथं येऊन सांगायचं ?

अण्णा : लोकांचा दोष नसतो. कमजोरी आपली असते.

आई : आणि करायचंय काय त्या मंडळींशी आपल्याला ? प्रत्येक वेळी असा त्रास करून घेतलास तर कसं चालेल ? सतीशना समजलं तर त्यांना काय वाटेल याचा विचार नको करायला आपण ?

सुधा : मला काय वाटत असेल याचा विचार का करत नाही तुम्ही ? मी माझ्या मनाशीसुद्धा प्रतारणा करायची ? मला काय वाटतं याचा विचारच नाही करायचा ?

अण्णा : लग्नाची पहिली घडी ती तशी विस्कटली. सारं परत स्थिरस्थावर व्हायला इतकी वर्षं गेली. आता किती जपायला हवं बरं ? सर्व परिस्थिती समजून घ्यायला हवी.

सुधा सदा न् कदा समजावत आले ती स्वतःलाच. अमुक विचार कर, हे विसर, ते मनात आणू नकोस...आज तो इंदूरला आल्याचं कळतंय्. मनाला एकच जाणीव सतावतेय्. या क्षणी मी फक्त त्याची झालेय्. माझ्या पोराची. त्याला पाहायची, त्याच्याशी बोलायची, त्याचे लाड करायची मला ओढ लागलीय.

अण्णा : सुधा –

सुधा : ओढ लागणारच, अण्णा. आई होताना या अनेक जीवघेण्या ओढीसुद्धा जन्माला येतात ना ?

अण्णा : आता लाख त्रास करून घेतला तरी परिस्थिती बदलणार आहे का ? रीतसर कायद्याची कारवाई झाली. दोघांचेही मार्ग बदलले. तुझ्याजवळ आनंदाची योग्य वाढ झाली नसती म्हणून त्यावेळी आपण त्याच्या कस्टडीसाठी ओढून धरलं नाही. तो पोरगा तुझ्या नव्या घरात रुजलाच नसता. तिकडे मोठ्या कुटुंबात त्याची चांगली वाढ होतेय्. बापच नाही नुसता, आईसारखी प्रेम करणारी आजी आहे.

सुधा : कायद्यानं समजूत पटवायला आपण कोर्टात नाही आहोत, घरात आहोत.

इथं समजून घ्यायला फक्त भावना लागतात. मनाचा न्याय तेवढाच ऐकायचा असतो. ऐकायचा आहे तो न्याय ? न हादरता ?...समजा, मी गेले शांतीताईंकडे आनंदाला पाहायला –

अण्णा : वेडी आहेस का ? भलतासलता विचार सुद्धा मनात आणू नकोस !

सुधा : का ?

अण्णा : तिकडे पाणउतारा करून नाही भेटू दिलं तुला आनंदाला, तर जीव दुखवून घेण्यापलीकडे हाती काही लागणार नाही.

आई : थोड्या दिवसांची गोष्ट आहे. एकदा तो मोठा झाला की मग आपण होऊन येईल बघ तुला भेटायला.

सुधा : कुणी पाहिलंय् इतकं पुढलं ? इतकी वर्षं तर अशीच निघून गेली, त्याच्या भेटीसाठी नुसती तडफडण्यात. आणि आता तो भेटण्याची शक्यता आहे तर तुम्ही मला मदत करण्याऐवजी माझ्यापुढं अडथळेच निर्माण करता आहात.

आई : पोरीचा सुखी संसार बघायला आलो आणि इथं हे वाढून ठेवलेलं.
[ दाराची बेल वाजते. सुधा डोळे कोरडे करते. ]

सुधा : मी बघते.

अण्णा : आता एकच कर. वाटेल ते झालं तरी त्या भल्या माणसाला–सतीशला यातलं अक्षरसुद्धा बोलू नकोस.

सुधा : मी ठरवते काय ते. [ सुधा अण्णा-आईंकडे बघते. दोघे आत जातात. सुधा दार उघडते. दारात सतीश. ]

सतीश : सुधा, आपोआप प्रश्न मिटला. तावडेचंच नक्की ठरतं नव्हतं.

सुधा : हं.

सतीश : ऐकते आहेस ना ?

सुधा : ऐकतेय्.

सतीश : अशी गप्प का ? व्हॉट्स् रॉंग ?

सुधा : काही नाही.

सतीश : ( तिच्या खांद्यावर हात ठेवत ) नक्की काहीतरी आहे. मला— तुझ्या सतीशला नाही सांगणार ?...इकडे माझ्याकडे बघ... ( तिचा चेहरा वळवून घेतो ) काय झालंय्, बोलशील तरी ? प्लीज, सुधा.

सुधा : आनंदा–माझा मुलगा इथं इंदूरला आलाय्.

सतीश : इथं ? एकटा आलाय् तो ?

सुधा : नाही, तो घरच्या लोकांबरोबर लग्नाला आलाय्.

सतीश : हं...आय् सी. ( विचारात पडतो. ) तो इथं आपल्या घरी येणार आहे ?

सुधा : कसं शक्य आहे ते ?... म्हणूनच निदान दुरून तरी त्याला पाहावं म्हणून जीव तडफडतोय् माझा. मी जाऊन पाहू त्याला ? ... माझी एवढी विनंती ऐकाल ?

सतीश : सुधा, विनंतीचा प्रश्न नाही, पण तुला हे सगळं इतकं सोपं वाटतं ?

सुधा : सोपं नाही वाटत आहे...पण ही एकच संधी आहे हो. परत तो कशाला कधी येणार आहे इंदूरला ! (सतीश विचारात पडतो)... म्हणून सारखं मनात येतंय्, आलीच आहे संधी ती घ्यावी. एकदा तरी त्याला डोळे भरून पाहावं.

(आतून अण्णा येतात.)

सतीश : सुधा, तू आत जाऊन तोंड धू. कपडे बदल...मग बोलू.

(सुधा आत जाते. सतीश विचारात पडतो.)

अण्णा : सतीश, सुधा भावनेच्या फार आहारी गेलीय्. आम्हाला वाटतंय्, हे सारं इथल्या इथंच थांबायला हवं...थांबायलाच हवं.

(सतीश मान हलवतो.)

[ काळोख. ]

## दृश्य तिसरे

[ सुधाचे इंदूरचे घर.
आधीच्या दृश्यानंतर दुसऱ्या दिवशी. वेळ : दुपारी चारची. आई पेपर वाचत बसलेली. फोन वाजतो. आतून अण्णा येऊन फोन घेतात. ]

अण्णा : हॅलो...येस्...सतीश ? काय हो ?.... नाही, सुधा आलेली नाहीए. आत्ता कशी येणार ? चार तर वाजताहेत...ऑ ?...वरं. (फोन ठेवतात.)

आई : सतीशचा फोन होता ?—सुधा आहे का म्हणून ?

अण्णा : हो नं. काही कळतच नाही. आवाजावरून सतीश काहीसे काळजीतही वाटले.

आई : दोघं तर कचेरीला बरोबरच स्कूटरवरून गेले.

अण्णा : वरं, मी काही विचारणार तर 'ठीक आहे' म्हणून त्यांनी फोन खाली ठेवला.

[ स्तब्धता. ]

आई : सकाळी चेहरा पाहिला होतात सुधाचा? रात्रभर झोपली नसेलसं वाटत होतं. मी विचारलं, पण ती काहीच बोलली नाही.

अण्णा : हो, सतीशच्या कानांवर नको ते जायचं. वातावरण आणखी बिघडायचं...

[ स्तब्धता. ]

अण्णा : कॅप्टनसाहेबांकडून येताना तू जरी बोलली असतीस, माणकीचं आणि तुझं काय बोलणं झालं ते–

आई : म्हटलं, तुमच्या डोक्याला आणखी त्रास नको. पण बोलायची ती बोल्लीच माणकी.

अण्णा : तरी आपण मुद्दाम थांबून राहिलो होतो सुधाजवळ.

आई : हो, नाहीतर त्या माणकीनं सुधाच्या डोक्यात काहीबाही वाट्टेल ते भरवलं असतं

[ बेल वाजते. आई दार उघडनात. दारात माणिक. हातात पिशवी. ]

आई : कालनंतर लगेच आलीस ग आज?

माणिक : आले. इथून जातच होते. म्हटलं, जरा डोकवावं, तुमच्या तब्येतीची चौकशी पण करावी...काल मग डॉक्टरांना बोलावलंत, की—

अण्णा : न...नाही. सतीशनी दुसरी कसली स्ट्राँग गोळी दिली आणि उतरायलाच लागला ताप.

माणिक : डॉक्टर येणार म्हणजे व्हिजिट फी लावणार तो पंधरावीस रुपये. त्यापेक्षा आठ–बारा आण्यांच्या गोळीत काम झालं. पैशापरी पैसेही वाचले...

आई : नाही हं. तरीही सतीश डॉक्टरना आणतो म्हणत होते.

माणिक : त्यांचं नाही हो, मी या डॉक्टरलोकांचं सांगत होते. इतके पैसे काढताहेत हे डॉक्टर! मागे माझ्या मिस्टरांच्या पाठीवर गळू झालं होतं. एवढंसंच होतं, पावलीएवढं. त्याचं बिल किती करावं डॉक्टरांनी! एकशे पस्तीस रुपये...सुधा आणि सतीश....दोघं ऑफिसात गेले असणार.

आई : हो. सुटी थोडीच आहे आज?

माणिक : म्हणूनच मुद्दाम या वेळेला आले. तुमच्याशी निवांतपणी बोलायला.... इथं किनई, पलीकडेच एक बेकरी आहे. 'बाँबे बेकरी' असा बोर्ड आहे बघा. तिथले मावा केक भयकर प्रसिद्ध.

अण्णा : अच्छा?

माणिक : अच्छा म्हणजे? बॉम्बेचे लोकसुद्धा इंदूरहून जाताना मुद्दाम ते केक घेऊन जातात. मी तर नेहमीच घेते मावा केक...सांगायचं म्हणजे, आत्ता त्यासाठीच आले होते या बाजूला...जरा सुरी घेता!

अण्णा
आई } : सुरी ?

माणिक : हां, केकचा नमुना दाखवते तुम्हाला.

आई : नको. राहू दे.

माणिक : अण्णासाहेब...

अण्णा : नको. गोडाचं फारसं खात नाही मी.

माणिक : डायबेटिस ना ?

अण्णा : नाही. पण नको !

आई : तुला खायचा असेल केक तर आणते सुरी.

माणिक : ( हसते ) मी ? मी तर एकदम आख्खाच खाते असा. ( केक काढून खाऊ लागते. ) काल तुम्ही सुधाला का बोलला नव्हता– तिचा मुलगा इथं आल्याचं ?

आई : बोलणारदेखील नव्हते ! पण तू बोल्लीसच शेवटी.

माणिक : ध्या ! मी बोल्ले म्हणजे सहज हो. वादळबिदळ तर उठलं नाही ना सतीश आल्यावर ? खरं म्हणजे मी तिला बजावणार होते... हो, नाहीतर ही तिथं पोराला भेटायला म्हणूनच जायची आणि ती माणसं कशी आहेत, तुम्हाला माहीतच आहे. ती तर टपूनच बसली होती. सुधा केव्हा येते आणि तिला आपण केव्हा फाडून खातो. सुधाला वाईट वाटेल म्हणून बोल्ले नाही मी तिला, पण तुम्हाला म्हणून सांगते. नागपूरला मी माहेरी गेले होते ना, तेव्हा भाऊकडे पोट्टा भेटला होता मला. तो तर साफ विसरूनच गेलाय् हिला. मी सहज म्हटलं त्याला, काय रे इंदूरला आल्यावर खऱ्या आईला भेटायचंय का तुला ? तर एक नाही आणि दोन नाही ! पण चला, सुधा नेहमीसारखी ऑफिसला गेल्याचं कळलं इथं, आता बरं वाटलं.

[ बेल वाजते. आई दार उघडतात. दारात सतीश.
माणिकची चुळबूळ सुरू होते. ]

आई : तुम्ही लौकर कसे आलात ?

सतीश : सुधा आली नाही अजून ?

अण्णा : नाही...का ?

सतीश : सांगतो मग. ( माणिककडे बघतो. )

अण्णा : ही कॅप्टन दिघ्यांची सून, माणिक. आणि हे सुधाचे यजमान, सतीश. ( दोघे नमस्कार करतात. )

माणिक : इथं आलेच होते, म्हटलं, आईंचं कसं आहे ते बघून जावं....आम्ही ‘ चंद्रलोक कॉलनी ’त राहातो. एकदा सुधाला घेऊन या की आमच्याकडे.

सतीश : येऊ. ( उठून फोन करतो. लागत नाही. )

माणिक : बँकेत म्हणजे तुम्हाला केव्हाही बाहेर पडता येत असेल...मला मिळत होती बँकेत नोकरी, पण मिस्टर म्हणाले, तुला काय गरज आहे नोकरीची ? मी हवं तेवढं कमवतोय्... मग नाही घेतली नोकरी.

सतीश : हं....( अण्णांना ) माझी कल्पना होती, सुधा घरी आली असेल.

माणिक : तिच्या ऑफिसमध्ये फोन करून पाहिलात ?

[ सतीश उत्तर देत नाही. अण्णा–आई भांबावलेले.
विलक्षण ताण. ]

( सतीशला ) तुम्ही कधी इकडच्या 'बॉम्बे बेकरी'तले केक आणलेत ? अतिशय छान असतात. तसे इतर बेकऱ्यांच्या मानानं महाग आहेत जरा, पण....( सगळे निर्विकार पाहून गप्प बसते. )

( सतीश फोन करू लागतो. )

[ स्तब्धता ]

माणिक : काल रात्री सुधाचं काही बिनसलं नव्हतं ना ?...तसा तिचा स्वभाव जरा.... ( आईकडे पाहून ) म्हणजे मनाला लावून घेणारा आहे.

आई : माणके, तू जरा गप्प बसलीस तर—

माणिक : काळजी वाटतेय् म्हणूनच मी बोलतेय् ना ?...काल तिच्या मुलाचं मी सहज बोलले, गेला असेल तिचा मूड. ( अण्णा–आई नर्व्हस ) हां, ( सतीशला ) पोराला भेटायला म्हणून ऑफिसात न जाता तिकडे कम्युनिटी हॉलमध्ये तर नसेल गेली सुधा ? मला तीच शक्यता वाटतेय्... म्हणत असाल तर मी जाऊन येऊ का तिकडे ? चमत्कारिक स्वभावाची माणसं आहेत ती एकेक....

[ अण्णा, आई डोक्याला हात लावून निराश होतात. ]

सतीश : माणिकबाई, मीच सुधाला तिच्या ऑफिसमध्ये फोन करून 'मुलाला बघायला जा' म्हणून सांगितलंय्. त्याप्रमाणे ती गेलीय्. तिच्या फक्त परत येण्याची वाट बघतोय् मी.

[ स्तब्धता. माणिक नर्व्हस. अण्णा–आई चकित.
दाराची बेल वाजते. सतीश दार उघडतो. दारात सुधा आणि पमा. ]

सुधा : ( पमाला ) ये ना आत...सतीश, ओळख करून देते हं. हा पमा. म्हणजे पद्माकर. आनंदाचा धाकटा काका आणि पमा, हे सतीश.

( दोघे नमस्कार करतात. )

सुधा : माणिकताई कशा आत्ता इथं ?

माणिक : आईंना बघायला ग. पमा, तुम्ही आजच निघताय् ना नागपूरला जायला ?

पमा : हो. का ?

माणिक : तू जाताना एक बॉक्स घेऊन जाशील—माझ्या माहेरी द्यायला ? इथल्या 'बॉम्बे बेकरीत—'

पमा : मावा केक ! ( सुधाला ) लग्नातसुद्धा ह्या मावा केकची इतकी जाहिरात केली माणिकनं...( माणिकला ) जाहिरातीबद्दल तुला त्या बेकरीनं आयुष्यभर फुकट द्यायला हवेत मावा केक !

सतीश : आपली आणि माणिकताईंची ओळख असेल, मला कल्पना नव्हती.

माणिक : आम्ही मावस भावंडं आहोत !....पमा, माझ्या घरी यायला वेळ नाही म्हणालास आणि इथं मात्र—

पमा : वेळ काढून आलो. हिचा आग्रह कसा मोडणार ?

माणिक : तू निघणार असशील लगेच तर आपण बरोबरच निघू. म्हणजे जाताना वाटेतच बेकरीतून—

पमा : नाही जमणार. इतक्या वर्षांनी भेट होतेय् आमची. तू निघालीस तरी चालेल. जाताना मी बॉक्स घेऊन जाईन. मग झालं ना ?

माणिक : सरळ सांग ना 'जा' म्हणून ? ( टाळीसाठी हात करते ).

पमा : ( टाळी घेत ) कळतं त्याला कशाला सरळ सांगायचं ?

माणिक : अरे, मी केव्हाच निघाले होते. पण म्हटलं, सुधा आली की निघावं. ती आली. काळजी मिटली. आता निघते...पुढल्या वेळी इंदूरला आलास की माझ्याकडे यायचं राहायलाच. शांतीताईकडे अडीच खोलीत राहाण्यापेक्षा आमचं घर चांगलं मोठ्ठं आहे.

पमा : इंदूरच्या राजवाड्यात जागा नाही मिळाली तर तुझ्याकडे नक्की.
( नमस्कार करून निरोप देतो. )
( माणिक 'बग्यू' करत निघून जाते. )

[ स्तब्धता. ]

सतीश : आनंद दिसला ?

सुधा : नाही !

सतीश : सो सॉरी !

सुधा : आमच्या ऑफिसातली मालती साठे तिकडे जवळच राहाते. तिच्या कीचनमधून कम्युनिटी हॉलचं पटांगण दिसतं. विचार केला, तिच्याकडे जाऊन तिच्या आईशी बोलता बोलता पटांगणाकडे लक्ष ठेवावं...पण काय ? एवढ्या उन्हातून गेले तर तिच्या दाराला कुलूप.

सतीश : आनंद असा कुठं दिसणं शक्य नव्हतं, मला कल्पना होती. पण तुझ्या इच्छेला मोडता घालायचा नाही म्हणून मी काही बोललो नाही. तुला 'जा'

म्हटलं फोनवर.

सुधा : मग हॉलसमोरच्या रस्त्यावरून उगाच फेऱ्या मारल्या.

आई : बाहेर ऊन नुसतं रणरणतंय्—

सुधा : आपल्याला जाणवलं तर ना ऊन ?...त्याला शोधण्यात मला जाणवलंच नाही ते. मध्येच चारसहा बायकांचा घोळका येताना दिसला समोरून. त्यात कुणी जुन्या ओळखीचं असायचं असं वाटून एकदम धडधडल्यासारखं झालं. मग काही नाही. सरळ पाठ फिरवली आणि दिशा बदलली.

पमा : आणि हिनं दिशा बदलली म्हणून आमची गाठ पडली ! मी पान खायला म्हणून बाहेर गेलो होतो एकटाच. लक्ष गेलं आणि इतका आनंद झाला हिला पाहून.

सतीश : हं.

सुधा : हा एवढासा होता तेव्हापासून आमची गट्टी होती....शाळेतून यायच्या वेळी घरात जर आई किंवा मी दिसले नाही तर लगेच तुझी चिडचीड सुरू व्हायची.

पमा : मग ? शाळेतल्या हकिकतींचा सगळा पाढा तुझ्यापुढं वाचायचा असे ना ? शाळेतून येताना आणलेल्या चिंचा चोरून तुला द्यायच्या असत.

सुधा : तेव्हा तू बासरी वाजवायचास. हल्ली वाजवतोस की नाही बासरी ?

पमा : क्वचित् कधीतरी. तेव्हा तू म्हणजे माझा हक्काचा श्रोता असायचीस.

सतीश : तुम्ही तुमच्या भेटीबद्दल सांगत होता.

पमा : (काहीसा नर्व्हस होऊन) हो...तर ही मला टाळून जायला बघायला लागली.

सुधा : टाळलं नाही रे. मी तुला ओळखलंच नाही.

पमा : मी जाऊन पुढंच उभा राहिलो हिच्या ! म्हटलं, धाकट्या भावाला टाळायला कसली बघते आहेस ग ? आम्हांला आनंद व्हावा आणि तुम्ही मात्र तोंड फिरवावं का ग ?

सुधा : तशी म्हटलं, घरीच चल आमच्या. इथून तसं जवळच आहे घर... आले घेऊन.

सतीश : हो, रस्त्यात बोलत उभं राहाण्यापेक्षा... (पमाला) आपण कधी इंदूरला येता ?

पमा : क्वचित कधी ऑफिसचं नाहीतर युनियनचं काम निघालं तरच.

सुधा : तू उंच किती झालास रे ! आणि मिश्यांमुळं तर जास्तच मोठा दिसतोस.

पमा : वयपरत्वे चालायचंच. त्यात गेल्या वर्षीच लग्न केलंय्.

सुधा : नाव काय बायकोचं ?

पमा : कल्पना.

सुधा : ती पण आली असेल ना तुझ्याबरोबर ?

पमा : हो. आली आहे.

[ स्तब्धता. ]

सतीश : एक्स्क्यूज मी, मला कामासाठी जरा बाहेर जायचंय्.

पमा : ( उठत ) मीसुद्धा निघतोच आहे.

सतीश : प्लीज, डोंट मिस्अंडरस्टँड मी. तुम्ही बसा. तुम्हाला मोकळेपणी बोलताही येईल.

अण्णा : सतीश, तुम्ही स्कूटर घेऊन जाताय् ना ? मला स्टेशनवर सोडलंत तर परतीचं रिझर्व्हेशन् करून येतो.

सतीश : चला.
( सतीश आणि अण्णा बाहेर जातात. )

सुधा : आई, अण्णांनी लगेच परत जायचं काय काढलंय् ?

आई : ते आले की त्यांनाच विचार. ( रागाने आत जाते )

पमा : मी आल्यामुळं तर इथं काही...

सुधा : नाही रे. आहे ते सगळं माझ्यामुळंच. तुझी काहीच चूक नाहीए. आणि मीच तर तुला हट्टानं घेऊन आलेय्. काहीही असू दे. आता सांग, तिकडे घरातली मंडळी कशी आहेत ? आई कशा आहेत ?

पमा : ब्लडप्रेशरच्या त्रासानं थकली आहे.

सुधा : आता मुख्य सांग. आनंदा कसा आहे माझा ? तो कसा दिसतो ? कसा बोलतो ? त्याला बघण्यासाठी जीव तुटतोय् रे सारखा.

पमा : तुझंच रूप, खूपसे तुझेच गुण घेऊन आनंदा आमच्या इकडेच वाढतोय् ना ? त्याची जरासुद्धा काळजी करू नकोस. मस्त वाढ होतेय् त्याची. अभ्यासात पण हुशार आहे. माझ्या लग्नानंतर जागा कमी पडायला लागली म्हणून आम्ही तिघे भाऊ वेगळे राहातो आता. मनात येईल त्याच्याकडे आई येते. हक्कानं राहाते. ती माझ्या घरी आली की आनंदा खूप वेळा माझ्या घरी येतो. त्यात त्याचं माझं विशेष सख्य आहे.

सुधा : असणारच रे ! तुझं—माझं सख्य होतं, माझ्या पोराचं नसलं तरच नवल.... आणखी सांग ना त्याच्याबद्दल.

पमा : क्रिकेटचा खूप नाद आहे त्याला. शाळेच्या टीमचा तो ओपनिंग बॅट्समन आहे.

सुधा : त्याला बक्षिसं वगैरे मिळाली असतील ना ?

पमा : तर ?...त्याचा मित्रपरिवार चिक्कार मोठा आहे.

ग्रा. क्र. २२७४ नों. दि. २७-२-८८
वि. नाटक



सुधा : हो ? म्हणजे त्याचा स्वभाव…,

पमा : अगदी त्याच्या आईसारखाच आहे !

सुधा : ( डोळे टिपत ) आणि घरात….

पमा : कौतुकच कौतुक…भाऊच्या नव्या बायकोला– कमावहिनीला तो आई म्हणत आलाय् . तिलाही त्याचा खूप लळा आहे. भाऊ सगळे लाड पुरवतो. सगळ्या नातवंडांत आजीचा तोच लाडका आहे.

सुधा : त्याला…त्याला काही जाणीवबिणीव….

पमा : तुझ्याबद्दल ना ? घरात बाकीच्यांना कळत नसेल, पण मला आतून वाटतंय् की त्याला नक्कीच तुझ्याबद्दल जाणीव असावी.

सुधा : कशावरून ?

पमा : नेमका पुरावा असा नाही देता येणार…पण हां, इंदूरला आधी यायचं नाही म्हणत होता, आणि मग काय जादू झाली कळत नाही, एकदम तयार झाला तो इकडे यायला. खुषीत देखील आला तो.

सुधा : खरं सांगतो आहेस हे ?

पमा : तुझी शपथ.

सुधा : म्हणजे… म्हणजे तो सुद्धा आशा बाळगून असणार आमच्या भेटीची… नक्कीच रे. पोराचं मन काय कळणार नाही आईला ? मध्ये वर्षानुवर्षं गेली म्हणून काय झालं ? आणि तुम्ही मोठ्यांनी आई–मुलाला एका हाकेचं अंतर तोडू दिलं नाही ? पोटच्या पोराला मी डोळ्यांनी बघायलादेखील पारखं व्हावं ? तुम्ही सगळे भाऊ तुमच्या आईवर इतका जीव लावता, तरी देखील तुम्हाला कुणाला आमची मायलेकराची एकदाही भेट व्हावी असं नाही वाटत ?….काय मिळवलंत रे साऱ्यांनी ? ( रडू लागते )

[ काही क्षण स्तब्धता. ]

माझं आयुष्य आतल्या आत असंच खंगत जाणार आहे का रे ?…या घरात कशाला काही कमी नाही, पण असं वाटतं, पोटात कुणी एकादं तीक्ष्ण धारेचं अदृश्य पातं ठेवून दिलेलं आहे. प्रत्येक हालचालीच्या क्षणाला ते पातं आपलं काम बजावत असतं रात्रंदिवस. ( रडू लागते ) आपणच आपली कींव करायची आणि स्वतःला समजावत राहायचं सदा.

पमा : कींव कशाला करायची ? आपल्या मुलाला भेटणं हा अधिकारच आहे तुझा. तू दुसरं लग्न केलंस म्हणून तो काही हिरावला जात नाही. दुसरं लग्न तर भाऊनं पण केलंय् . तुझ्याही आधी… मला समजतेय् ग तुझी तडफड. पण ह्या आमच्या लोकांचा अट्टाहास काही कळत नाही. तुझी भेट झाली तर आनंदा तुझा ध्यास घेईल अशी त्यांना भीती वाटते. मी सगळ्यात धाकटा. घरातले महत्त्वाचे

निर्णय माझ्या हातात नाहीत. पण तरीही त्याची आणि तुझी भेट घडवून आणण्याची संधी आली तर तुझा भाऊ म्हणून तुझी मी पाठ राखीन. साऱ्यांचा विरोध असला, तरीही !... आजच्याऐवजी काल आपण भेटलो असतो तर काहीतरी युक्ती काढून त्याची आणि तुझी मी भेटही घालून दिली असती.

सुधा : अजून जमेल ?

पमा : नाही ग. आता कठीण आहे. सगळे रात्रीच्या गाडीनं परत जायच्या तयारीत आहेत.

सुधा : मला त्याचा एखादा फोटो काढून पाठवून देशील ?

पमा : नक्की ! तू निराश व्हायचं नाहीस. मी बोल्लो त्यावर विश्वास आहे ना तुझा ?

सुधा : अगदी मनापासून ! तसं नसतं तर सात पदराआड दडवून ठेवलेलं दुःख तुझ्यापुढं असं ओतलं नसतं.

पमा : इतकी वर्षं सोसलंस. आणखी थोडं सोस. ( खिशातून कार्ड काढून देत ) या कार्डावर माझा घरचा आणि ऑफिसचा पत्ता आहे. अगदीच असह्य झालं तुला तर ताबडतोब निघून ये माझ्याकडे.

सुधा : असह्य होण्याचाही काही कालावधी असतो. जखम दुखते दुखते मग आतल्या आत तिचं कुलूप बनतं. आता काही मिरॅकल झालं तरच त्याची आणि माझी भेट होणार. करू नये तो गुन्हा केलाय् ना मी ?...( क्षणभराने ) आईपणाचा विचार न करता एका पुरुषाशी संबंध तोडण्याचं धाडस केलं. त्याची फळं भोगायलाच हवीत.

[ स्तब्धता. ]

मी वेड्यासारखी तुलाच सुनवत बसले. पण करू काय रे ? कुणी भेटतच नाही असं, ज्याच्याजवळ मनाच्या जखमा उघड्या करता येतील. सतीश चांगला माणूस आहे, पण हे दुःख त्याला परकंच नाही का ? तू अचानक भेटलास, क्षणभरासाठी का होईना, दुःखाचं ओझं मी तुझ्याकडे दिलं.... पूर्वीचाच पमा वाटलास म्हणून बोलत गेले...

पमा : तुझ्यासाठी मी नेहमीच तसा असेन !

सुधा : खूप. ..खूप बरं वाटलं तुझ्याशी बोलून.

( अण्णा बाहेरून येतात. )

पमा : निघू मी आता ?

सुधा : हो....दोनच मिनिटं. ( आत जाऊन छोटीशी डबी आणते, त्याला दाखवते ) परवा हौसेनं ही इअर रिंग्ज आणली आहेत.

पमा : छान आहेत.

सुधा : (त्याला डबी देत) ही तुझ्या कल्पनेला दे. माझी छोटीशी भेट म्हणून. नाही म्हणू नकोस. मला राग येईल. (आत बघून) आई, पमा निघालाय्. (आई बाहेर येतात. पमा आई–अण्णांचा निरोप घेऊन जातो.)

[स्तब्धता.]

अण्णा : पमाला तू इथं आणणं आम्हाला आवडलं नाही, सुधा. आयुष्यात इतकी भटकंती झाल्यानंतरही तुला एकमेकांचे संबंध एकमेकांत कसे नाजूकपणं गुंतलेले असतात, एवढं समजू नये!

आई : अग, ज्यांच्याबरोबरची सारी नातीगोती कायद्याच्या परवानगीनं तोडलीस त्यांच्यामध्येसुद्धा पोरापायी अशी जन्मभर गुंतलेली राहाणार आहेस?

अण्णा : तुझी कूस तुला तिथंसुद्धा लाचार करतेय्! तुझ्या वाचनाचं, नव्या विचारसरणीचं मी कौतुक करत होतो इतके दिवस. पण ऐनवेळी विवेक राहातोय् का तुला? बंधन तुटलं तरी आईपण आलं का तोडता? त्याच्यापायी फरपट आहेच अजून!

आई : शिवाय सतीशना काय वाटेल याचा विचारदेखील नको करायला तुला? बोल ना!

सुधा : सतीशशी लग्न केलं म्हणजे मी आनंदाला विसरलेय्? माझा सारा दिवस माझ्या या संसाराचा असला तरी रात्रभर मला पोराची स्वप्नं पडत असतात. छातीत कोंडल्यासारखं होतं. मी...मी माझ्याच हुंदक्यांनी जागी होते, माहीत आहे? (रडवेली होते).

आई : कल्पना आहे ग आम्हाला. पण असं बघ, आनंदा अजून बच्चाच आहे तसा. उद्या तू दिसलीस आणि तो मग बिचकला म्हणजे? तुझ्याजवळ राहाण्याचा त्यानं हट्ट धरला म्हणजे?

अण्णा : त्या घरात सुखात मोठा होतोय तो. या घरात होईल त्याची मनमोकळी वाढ? तसा उपराच ठरेल ना तो इथं? मुलाच्या वाढीला प्रेम आईचं हवं असलं तरी घर बापाचं लागतं, बेटा! तुझ्या प्रेमाची तूट भरून काढायला त्याची आजी आहे तिथं...पण.... पण तू त्याला भेटायला गेलीस तर त्याचा बाप तुझा अपमान करील.

सुधा : माझा अपमान करायचा त्यांचा अधिकार तुम्ही मानताय्! अधिकार फक्त आईच्या प्रेमाला नाही! वा रे!

आई : बंधनं तुटली एकदा की–

सुधा : बंधनं तुटली तरी मीच त्याची आई आहे हे सत्य बदलता येईल? माझ्याशी संबंध तुटल्यानंतर त्यांनी दुसऱ्या बाईशी लग्न केलं तरी मुलावरचा त्यांचा पूर्णाधिकार तुम्ही सारे मान्य करता, पण इतक्या वर्षात माझी आणि

माझ्या मुलाची एकदा तरी भेट व्हावी एवढी सोय करायला कुणीही धजत नाहीए. माझ्यावर अन्याय होतोय् हेच कुणी मान्य करायला तयार नाहीए.

( सुधा बोलत असतानाच सतीश येतो. अण्णा–आई धास्तावलेले. )

सतीश : ( हळुवारपणे ) कशाला एवढा ताप करून घेते आहेस, सांगशील सुधा ?

सुधा : काय सांगायचं ? साधं एका आईचं मन कळत नाहीय यांना. बंधनं तोडायचा व्यवहारी उपदेश करताहेत एकेक.

सतीश : मग काय चुकलं त्यांचं ? मी भेटायच्या आधी त्यांनीच जपलं होतं ना तुझं मन ? त्यांचाच आधार होता ना तुला ? आणि सुखानं जगायचं असेल तर व्यवहार सोडून कधीच चालत नाही बघ...लग्नाच्या वेळी आपण ठरवलं होतं, पाठचं सारं काही विसरून कोरी पाटी घेऊन संसार मांडायचा. बरोबर ? तरी अचानक हे वादळ आलं.

सुधा : पण तेव्हा मला या वादळाची कल्पना आली नव्हती.

सतीश : आणि आली असती तर ?

सुधा : तर काही वेगळंही घडलं असतं. कारण आईचं नातं प्रथम उभं राहातं स्त्रीच्या मनात. पोराबद्दल वाटणारी ओढ सर्वांत चिवट असते !

सतीश : म्हणूनच तुला मी परवानगी दिली ना आनंदाला पाहून यायची ? त्याच परवानगीच्या बळावर तू पमाला इथं आणू शकलीस.

सुधा : तुम्ही माझ्यावर केलेल्या उपकारांची यादी फारच मोठी आहे नाही, तशा अर्थी नाही बोलत आहे मी. तुमच्या जागी दुसरं कुणी असतं तर मनातलंसुद्धा कधी बोलता आलं नसतं. या अशा वादळानं माझ्या मनाच्या पार चिंधळ्या चिंधळ्या उडवल्या असत्या.

सतीश : आनंदा तुला भेटला असता तर मलासुद्धा समाधान वाटलं असतं. पण तो नाही भेटला. एक संधी हुकली. हे वादळ खरं तर इथंच शमायला पाहिजे होतं.... पण आता तूच पुन्हा त्या जुन्या वादळाकडे धावत निघाली आहेस.

सुधा : नाही हो... त्या वादळाकडे मी कधीच पाठ फिरवली आहे. फक्त मुलाची आठवण नाही विसरू शकले. त्याला एकदाच डोळे भरून पाहिलं तर वाटतं, ही तडफड संपेलसुद्धा.

सतीश : असं कधी घडत नाही, सुधा. भेटीनंतर ओढ आणखी वाढणार. ओढीमुळं तडफडसुद्धा वाढणार.

सुधा : मला तुमचं सगळं पटतंय् हो. पण मला फक्त माझ्या पोराची भेट हवीय.... फक्त एकदाच.

[ वातावरण तंग ]

( पहिला अंक समाप्त )

# अंक दुसरा

## दृश्य : पहिले

[ नागपूरचे भाऊचे घर. सुलू आणि आनंदा. आनंदाच्या हातात रुबिक् क्यूब. सुलू गोष्ट सांगण्याच्या रंगात आलेली— ]

सुलू : ...तर जहाज आपलं नांगरून पडलं होतं समुद्रात. इतक्यात चाच्यांनी एकदम हल्ला केला जहाजावर. कप्तानानं हुकूम सोडला : ताबडतोब सगळे दोरखंड कापून टाका. सगळे तावातावानं उठले. पण राका मात्र स्वस्थ बसून होता. तो कशाला उठेल ? चाच्यांना तो फितूर झाला होता ना ?

आनंद : ( क्यूबमध्ये गुंतलेला ) शेवटच्या रोपर्यंत जमलं होतं....

सुलू : ( क्यूब ओढून घेत ) तुझं गोष्टीकडे लक्ष नाहीए ना, माझ्या ? मग आम्ही कशाला गोष्ट सांगावी ?

आनंद : मी....मी ऐकत होतो ना !

सुलू : असं ? मग सांग बघू मी कुठपर्यंत आले होते ?

आनंद : अं...चाच्यांबद्दल तू काहीतरी...

[ सुलू रुसून दूर जाते ]

( तिच्याजवळ जात ) तुला सांगू ? इंदूरहून आल्यापासून मला काही सुचतच नाहीए. आई भेटेल म्हणून इंदूरला आलो मॅच सोडून. आणि काय ? आई पण नाही आणि मॅच्‌मध्ये आमच्या टीमचा धुव्वा उडाला.

सुलू : कमामामी आणि जास्तकरून भाऊमामा इंदूरला सारखे तुझ्याबरोबर राहात होते सुद्दाम, म्हणून झाला घोटाळा. तू शांतीआत्याच्या मुलांबरोबर गेला असतास बाहेर, नाहीतर पमामामाच्या बरोबर....त्याला तू हळूच सांगितलं असतंस तरी जमलं असतं.

आनंद : पण आई आणि भाऊ सारखे म्हणायचे—

सुलू : मग ' सुद्दाम ' कशाला म्हटलं मी ? माईच्यासुद्धा लक्षात आलं ते. तुला माहीत आहे ?

आनंद : काय ?

सुलू : पमामामा बहुतेक तुझ्या खऱ्या आईला भेटून आलाय म्हणतात इंदूरला. परत येताना माई हळूहळू माझ्या बाबांना सांगत होती गाडीत, तेव्हा ऐकलं मी.

आनंद : माईआत्याला कुणी–पमाकाकानं सांगितलं हे ?

सुलू : अंहं. त्या माणिकताई नाहीत का इंदूरच्या ? त्यांनी म्हणे पमामामाला पाहिलं तुझ्या आईकडे गेल्याचं....

आनंद : ( विचारात पडतो ) नक्कीच असावं. कारण तिकडून आल्या आल्या त्यानं मला गच्चीवर नेऊन माझा एकट्याचाच फोटो काढला. 'कशासाठी' म्हणून विचारावंसं वाटलं होतं मला त्याला, पण नाही विचारलं. माझ्या आईकडे पाठवण्यासाठीच त्यानं काढला असणार फोटो.

सुलू : असणार. आता तू जाऊन विचार पमामामाला. त्याची आणि तुझी तर जाम दोस्ती आहे. तो सांगेल तुला एकूण एक. पण लक्षात ठेव, हे सगळं गुपचूप व्हायला हवं. भाऊमामाला नाहीतर कमामामीला कळलं तर वांधे होऊन जातील.

आनंद : होऊ देत झाले तर ! इंदूरला नेऊन माझ्यावर लक्ष ठेवतात पोलिसांसारखे ! आपण नाही आता खपवून घेणार ( क्यूब फेकून देतो ).

सुलू : बघ ना ! स्वतःच्या खऱ्या आईलासुद्धा भेटू देत नाहीत म्हणजे काय ?
( आतून आजी येते. )

आजी : कसला आवाज झाला रे, आनंदा ?

आनंद : कसला नाही.

आजी : पण मी चांगला ऐकला.

आनंद : मग उंदीर पळाला असेल !
( सुलू हसू लागते. )

आजी : हसायला काय झालं ग तुला, पोट्टे ? मुलीच्या जातीनं फार हसू नये. आणि मघाशीच निघाली होतीस ना घरी जायला ? माई वाट पाहात असेल तुझी. जा आता.

आनंद : ती मला गोष्ट सांगत होती, आई.

आजी : आलीय् मोठी गोष्ट सागणारी ! उशीर किती झालाय बघ. ( सुलू उठते ) निघाली लगेच. माईसाठी काढून ठेवलेला डबा कोण—मी आणून देणार आहे ? आतला डबा घेऊन जा. नीट माईच्या हाती दे आणि थांब. पळतेस कसली सारखी ? माईला म्हणावं, कधीतरी सवड काढून दुपारची अशी ये गोष्टी करायला.

( सुलू आत जाऊन डबा आणते. )

सुलू : जाते रे, आंद्या.

आजी : आंद्या ?

सुलू धावत निघून जाते. धाडकन् दार ओढते. लॅचचा आवाज.
आजी हसते. )

लहानपणी माई अगदी अशीच होती ! आनंदा, सुली तुला खरंच गोष्ट सांगत होती की —

आनंद : एकदा सांगितलंय ना ?

आजी : असा रे काय चिडचिडल्यासारखा करतोस हल्ली ? इंदूरहून आल्यापासून बघतेय् मी. यायचं नव्हतं इंदूरला तर मग कशाला आलास पमाकाकाचं ऐकून ? ( आनंदा काहीच प्रतिसाद देत नाही. ) काय बिनसलंय् बापा, तुझं ? हल्ली खेळायलादेखील जात नाहीस संध्याकाळचा. एकटाच बसून राहतोस हातात चेहरा धरून.

[ दाराची कडी वाजते. एकदा. दोनदा. ]

आनंद : ( चिडून ओरडतो ) आलो, थांबा.

[ जाऊन दार उघडतो. दारात भाऊ आणि कमा. दोघांच्या हातात सामान. ]

भाऊ : केवढ्यानं ओरडायचं रे ? आणि आईच्या हातातली पिशवी कोण घेणार ?

[ आनंद त्रासिकपणे पुढे होतो. कमाच्या हातातली पिशवी जवळजवळ खेचूनच घेतो. ]

कमा : हळू...

भाऊ : हात काय निखळून टाकायचाय् तिचा ?

कमा : काय झालंय् रे तुला ?...काल आईंचा डोळा लागला होता आणि मी गच्चीवर वाळवणं सारखी करत होते. तर हा कडी वाजवत राहिला जोर-जोरात. जिने उतरून यायला वेळ नाही लागणार ?

[ कमा बोलत असताना आनंद पिशवी आत नेऊन ठेवतो. येऊन दारात उभा राहातो. ]

भाऊ : नीट ठेवलीस ना पिशवी ? तुला आवडतं म्हणून श्रीखंड आणलंय्.

आनंद : मला नाही आवडत श्रीखंड.

आजी : गुढीपाडव्याला केलेलं श्रीखंड खाल्ल्यापासून म्हणे हिक्क बसलीय् त्याला श्रीखंडाची.

आनंद : चक्क्याला फार वास होता त्या वेळच्या.

भाऊ : पगलोटच आहेस ! एकदा वास होता म्हणून नेहमीच थोडा असेल ? शिवाय आज मुद्दाम पैठणेकडून आणलाय् मी चक्का.

आनंद : पैठणे मैदा मिसळतो चक्क्यात. माझा दोस्तच सांगत होता.
कमा : शहाणा आहे तुझा दोस्त फार ! जेवताना श्रीखंड माग दुसऱ्यांदा–
आनंद : पहिल्यांदाच नको वाढूस ना !
आजी : विचार करून बोल हो. जेवताना मग मागशील तेव्हा कळेल.
आनंद : बघशील ! ( आत जातो. )
कमा : आजकाल जरा जास्तच होत चाललाय् हा मुलगा. सकाळी 'बाजारातून थोडा सांबार आणून दे' म्हटलं तर सरळ 'नाही' म्हणाला.
आजी : अग, सांबार आवडत नाही ना त्याला ?
भाऊ : हा काही मुद्दा नाही, आई. हिनं सांगितलं एकादं काम तर तेवढं करायला नको का ह्यानं ? मी मघापासून मार्क करतोय्. किती उर्मटासारखा वागतोय् !
कमा : कुणास ठाऊक काय बिनसलंय् त्याचं हल्ली ! मी आपली माझ्याकडून जास्तीत जास्त प्रयत्न करत असते त्याला खूष ठेवण्याचा. पण ह्याच्या बघावं तर नाकाखाली आणि गळ्याखालीच.
भाऊ : तू कशाला वाटून घेतेस ? मी करतो त्याला सरळ.
आजी : जाऊ दे रे. पोराचं काय एवढं मनावर घ्यायचं ? वाढाळू वयात पोरं होतात थोडी अधिक.
कमा : आता तुम्ही बसा आईंशी गोष्टी करत. मी स्वयंपाकाला लागते. (कमा आत जाते.)
आजी : आज मध्येच श्रीखंडाचा बेत कशासाठी रे ?
भाऊ : आमच्या लग्नाचा वाढदिवस आज मध्येच आलाय् ना ?
आजी : ध्यानातच नाही बघ माझ्या. नाहीतर कमाला काहीतरी आणून दिलं असतं मी... तू तिला पातळबितळ तरी घेतलं आहेस का... एवढे बाजारातून जाऊन आलात ते ?
भाऊ : सुचलंच नाही ग ! आणि कमाही काही बोलली नाही.
आजी : गरीबच आहे रे ती. आनंदावर आणि जीव किती तिचा ? कुणाला सांगून खरं वाटणार नाही, ही त्याची जन्मदात्री नाही म्हणून ! आजूबाजूला बघते ना मी ? दुस्वास करणाऱ्या बायका ? पण हिच्या मनातसुद्धा असलं काही यायचं नाही कधी.
भाऊ : खरं आहे. कमा अशी नसती तर केवढा प्रश्न उभा राहिला असता माझ्यापुढं ?
आजी : तुझ्यापुढंच का रे बापा ? आपल्या सगळ्यांच्याच पुढं प्रश्न होता तो. साऱ्यांचाच जीव आहे पोट्ट्यावर. पमा तर काय ? त्याचा म्हणेल तो हट्ट पुरवायला तयार असतो सदा.

भाऊ : पोराचं तेवढंच नशीब म्हणायचं.

आजी : खरं नशीब, कमासारखी आई मिळाल्याचं...भाऊ, कमासाठी तू आज पातळ घ्यायला हवं होतंस बघ. पैसे नसतील तर मी देते माझ्या ट्रंकेतले. अरे, मागत नाही, हट्ट करत नाही त्याला आधी आणून द्यावं. पटतंय् ना ?

भाऊ : तुझं कधी काय पटलं नाही आम्हाला ? तू आहेस तर सारं घरदार आहे.

आजी : मग ऐक माझं. अजून उघडी असतील दुकानं. जाऊन कमासाठी म्हणून काहीतरी घेऊन ये...विचारू नकोस तिला. ती नाहीच म्हणेल. मुकाट्यानं असाच जा रिक्षा करून आणि घेऊन ये. चकित करून टाक पोरीला.
(भाऊ उठतात. कपडे करून हळूच बाहेर पडू लागतात—)
जाताना तेवढी पोथी आणि माझा चष्मा आणून दे इथं. दार उघडंच राहू दे. आहे मी इथं बसलेली.
(भाऊ पोथी, चष्मा देऊन जातात. आजी पोथी वाचू लागतात. क्षणभरानं आनंद आतून येतो. आजीजवळ बसतो.)

आनंद : पाय चेपू तुझे ? (आजी हसते) काय झालं ग ?

आजी : अगदी बापाचा नमुना तू म्हणजे ! मी जरा आडवी झाले की तुम्हाला पाय चेपल्याशिवाय चैन नाही...अभ्यास राहिला असेल ना करायचा ?

आनंद : उद्या लौकर उठून करीन. आज मला मन नाही लागत आहे.

आजी : असा सारखा चिडचीड करतोस ! मन कसं लागावं रे मग ? तू असा वागतोस, मग भाऊला त्रास होतो. माझा जीव घाबरा होतो या प्रकरणात. (त्याला जवळ कुशीत घेते. तो हमसाहमशी रडू लागतो.) तुझ्यासाठी तरी काही वर्षं जगायला हवंय् रे मला. उगी उगी बाळा... वेड्यासारखं करू नये....कोणी रागावलं का माझ्या पिलाला ? आईशी भांडण झालंय् का ? मी हवी तर विचारते तिला सकाळी....सांग तरी तोंडानं काय होतंय् ते... तब्येत तर बरी आहे ना ?
(आनंद मान डोलावतो) मग ?

आनंद : आज...आज मला सारखी तिची आठवण येतेय्. काही सुचत नाहीए.

आजी : कुणाची....कुणाची आठवण येतेय् ?

आनंद : तिचीच...माझ्या खऱ्या आईची. इंदूरला असते ना ती ? तिचीच.

आजी : आता रे देवा ! तुला कुणी सांगितलं हे ?

आनंद : मला आधीपासूनच माहीत आहे.

आजी : मग आजच काय झालं आठवण यायला ?

आनंद : आज... भाऊंच्या लग्नाचा वाढदिवस. (हुंदका) सुलीनं मला सगळं सांगितलंय्. इंदूरला लग्नाला जायच्या आधीच.

आजी : काय तरी अगोचर पोट्टी ! थांब, तिला चांगली थोबडते.

आनंद : तिची काय चूक ग ? तिनं नुसतं आपलं मला सांगितलं....आणि इंदूरच्या माणिकताईंनी तर... वाईट्ट आहे ती !

आजी : मरू दे तिला, आपण कुणाचं काही ऐकू नये, बापा.

आनंद : पण मला कुणी कळू का देत नाही काही ? मला माझ्या आईला बघायला बंदी का ? ( रडू लागतो ).

आजी : तू तरी काय पोट्ट्या, त्या मुलीचं मनावर घेऊन बसलास ? बोहचकच आहे ती कार्टी. आणि ती माणकी तर...खादाडभवानी....आणि तू तरी असं का वाटून घ्यावं ? भाऊ तुझे लाड करतो. कमा कशी प्रेमानं वागते तुझ्याशी. तू असं वागल्यानं त्रास कुणाला होईल राजा ? तुलाच ना ? आणि तुझ्याबरोबर ह्या बुढीला. आता हे भाऊला समजलं तर ? नको रे बाबा आता पुढे वाढवूस. आपण आपला अभ्यास करावा. आनंदी राहावं बामिजास. समजतंय् ना मी काय सांगतेय् ते ?
( आनंदाचे हुंदके चालूच )
[ त्याला गोंजारत ] नाही खरं पोरा तुझ्या नशिबात मातृसुख. पण मी आहे ना ?

आनंद : तू काय ? सर्वांचीच आहेस. माझी एकट्याची अशी आई कुठंय् ?

आजी : का बरं ? कमा नाही करत तुझं, आईसारखं ?

आनंद : आईसारखं करत असली तरी आई थोडीच आहे ती माझी ?

आजी : गप ! असं बोलू नये. एवढ्यात भाऊ येईल....आता वेड्यासारखं काहीएक डोक्यात घ्यायचं नाही. आधी मोठा हो. मग बघू.

आनंद : शीः तुम्ही कुणी कधी काही बघणार नाहीत. मला पक्की खात्री आहे.

आजी : माझ्यावर तर विश्वास आहे ना तुझा ?

आनंद : मला माझ्या खऱ्या आईला भेटायचंय, खलास. विश्वास बिश्वास मी ओळखत नाही. तू घालून देतेस का माझी आणि आईची भेट ?

आजी : पण मोठा तर हो आधी...

आनंद : एवढा वेळ नाहीय मला. ( उठतो. जायला निघतो. )

आजी : ए वेड्या, आता भलत्या वेळी कुठं जातो आहेस बाहेर ? भाऊ आला आणि त्यानं विचारलं तर काय सांगणार मी बुढी ? लक्षात घे रे...पुन्हा सांगते, मोठा हो...

आनंद : माझ्या वर्गातला चंदू कीर्तने आठवतो ! ताप आल्याचं निमित्त झालं आणि दोन दिवसात वारला ! अवघ्या दहाव्या वर्षी.... मोठा होण्याच्या अगोदरच. ( तावातावाने बाहेर पडतो. )

वा. २२०७५ नों. दि. ...२२.१०
दि. ........ ग्रारु



आजी : आनंदा ... माझ्या राजा ... ( म्हणत दाराशी जाऊन कोसळते. )

[ काळोख. ]

## दृश्य : दुसरे

[ नागपूरचे भाऊचे घर. वेळ संध्याकाळची.
भाऊ तावातावाने घरात येतात. ]

भाऊ : छान. उत्तम. घराची दारं सताड उघडी. कुणीही चोरानं यावं आणि घर साफ धुऊन न्यावं. अरे, कुणी आहे का घरात ? का सगळे कुठं तमाशाला जाऊन बसलेत ?

( कमा आतून घाबऱ्या घाबऱ्या येते. )

कमा : काय झालं ?

भाऊ : दाराच्या कड्या-बिड्या काय तुटल्या का ? का त्याही कुणी चोरून नेल्या ? दारं उघडी टाकून देतात म्हणजे काय ? कोण...गेलं कोण बाहेर ? नाही तंगडी तोडली—

कमा : आत्ता एवढ्यातच दादासाहेब आणि मोठ्या वहिनी येऊन गेल्या. दादासाहेब ऑफिसच्या दौऱ्यावर निघाले होते, म्हणून आईंना भेटायला—

भाऊ : अरे, पण तुम्हाला दार लावायला काय धाड भरली होती ?

कमा : चुकलं खरंच माझं...सुटलं ऑफिस ?

भाऊ : सुटल्याशिवाय का घरी आलो ?

( आतून आजी येते. )

कमा : नाही, लौकर आलात म्हणून विचारलं.

भाऊ : मग पुन्हा जाऊन बसू का ऑफिसात ?

आजी : अरे, पोरीनं सहज विचारलं, त्यात एवढं चिडायचं कशाला ? बस जरा आरामात.

भाऊ : ( बसत ) लौकर आलो तर 'लौकर कसे ?' उशिरा आलो तर 'उशीर का ?' घरात शिरल्याबरोबर रोज कसले प्रश्न ?

( आजी कमाला खूण करते. )

कमा : रोजचा चहाचा प्रश्न तरी करायचा का नाही ?

भाऊ : तो सुद्धा करायचा नाही. कळलं ?

आजी : कमा, तू मुकाट्यानं आत जाऊन चहा ठेव त्याचा. आज काम जास्त पडलं असेल हापिसात. पुरुषांच्या डोक्याला होतो त्रास त्याचा.

भाऊ : कामाचा त्रास परवडला, पण हा आपल्याच माणसाचा त्रास नाही परवडत.

आजी : म्हणजे ? कुणी काय केलं रे ?

भाऊ : तुमचे लाडके चिरंजीव...

आजी : पमा ?

भाऊ : मग दुसरं कोण ?

कमा : काय केलंय् त्यांनी ?

आजी : हल्ली युनियनचा कुणीतरी आहे, तिकडे काही झालंय का नोकरीबाबत ? दादा त्याला नेहमी सांगत असतो, ही युनियनबाजी सोड म्हणून...त्याच्या नोकरीचं काही ?

भाऊ : नोकरी गेली त्याची, तर दादा आणि मी जन्मभर पोसू त्याला बायकोमुलां-सकट. नोकरीचं काही नाहीए.

आजी : मग रे ? असं आडून आडून बोलू नकोस.

भाऊ : त्यानं आडून आडून काहीही केलेलं चालतं तुला, पण आम्ही मात्र आडून-सुद्धा बोलायचं नाही.

कमा : आता कपडे बदला, चहा करून आणते तो घ्या. मग सांगा सवडीनं पमानं काय गोंधळ घातलाय तो....

भाऊ : मी काही एक करणार नाही. पम्या एवढयात इथं आला नाही तर मी असाच त्याच्या घरी जाऊन त्याला धरून इथं आईसमोर घेऊन येणार आहे.

आजी : पमा येतोय इथं ?

भाऊ : यायलाच हवा. ऑफिसच्या शिपायाच्या हाती त्याला अर्जंट चिठी पाठवलीय, त्याच्या ऑफिसवर. शिपाई देऊनसुद्धा आलाय् चिठ्ठी.

कमा : चिठ्ठी म्हणजे ?

भाऊ : चिंठ्ठी ! कळलं ?

कमा : माझ्यावर कशाला चिडताय् सारखे ?

भाऊ : मी वाट बघतोय् त्याची आणि तुम्ही मध्येमध्ये फालतू प्रश्न विचारत राहा. दादा दौऱ्यावर चाललाय् म्हणून, नाहीतर तो हंटरच घेऊन आला असता पम्याची पाठ मऊ करायला.

[ स्तब्धता. ]

(वैतागून) अरे, मी म्हणतो, पम्या आपलं थोबाड दाखवेपर्यन्त कुणी काही बोलाल का नाही ?

कमा : बोललं की तुम्ही लगेच चिडचीड करता. मग बोलावं तरी काय माणसानं ?

भाऊ : आकडे मोजावेत आकडे ! एक दोन तीन चार असे. हजारा–दीड हजारापर्यंत.

कमा : बोलू ?...चिठी रागाची पाठवली असेल तर पमा एकाद वेळी यायचा नाही.

भाऊ : मला काय गाढव समजता ? चिठ्ठीत लिहिलंय्, 'आठवडाभरात आला नाहीस, आज संध्याकाळी न विसरता ये. आई पण आठवण काढतेय तुझी.' बरोबर आहे ? नसेल तर त्याच्या घरी जाऊन दुसरी चिठ्ठी मी स्वतः देऊन येतो...हरामखोर ! घरादाराची प्रतिष्ठा पाळायची की ती धुळीला मिळवायची ?

[ बाहेर स्कूटरचा आवाज. ]

कमा : (बाहेर बघत) पमाच आलाय्. बरोबर कल्पनादेखील आहे.

भाऊ : आता तिला कशाला आणायचं ? मनासारखं झाडता पण यायचं नाही त्याला.

[ पमा आणि कल्पना येतात. ]

पमा : घरी गेलो. कल्पनेला चिठी दाखवली तुझी. म्हटलं येतेस तर चल बरोबर.

भाऊ : (नाटकीपणे) ते एक बरंच केलंस !

पमा : मातोश्री काय म्हणताहेत ?

आजी : जगतेय्.

पमा : जगायला तर पाहिजेच तुम्हाला. आमची काय म्हणे आठवण काढताय ?

कमा : ती तर रोजचीच असते. शेंडेफळ ना !

पमा : पण आजची आठवण...मातोश्री, ही काही युनियनबाजीबद्दल नसणार. चिठी आली तेव्हाच अंदाज बांधला. वाटतं तसं वातावरण काही ठीक नाही. (भाऊला) काय रे ?

भाऊ : युनियनचा प्रेसिडेंटच तू...

पमा : वाकडा अर्थ आधी मनात येणार ! असंच ना ? (हसतो)

कमा : चहा घेणार ?

कल्पना : नको. चहा घेऊनच निघालो आम्ही.

पमा : भाऊचा झाला नसेल, त्याला हवा तर द्या आणून. आमचा झालाय्.

भाऊ : माझी नको काळजी करूस.

पमा : आई, भाऊकडे आहेस म्हणजे कमावहिनी घड्याळाकडे लक्ष ठेवून तुझं औषधपाणी करत असणार, म्हणजे तुझीही काळजी करायला नको...पण

तुझा चेहरा मात्र ओढल्यासारखा वाटतोय्. माझ्या आठवणीनं म्हणत असशील तर आता मी आलेय्. (भाऊंना) दादाला बोलावलं असशीलच.

भाऊ : तो दौऱ्यावर जातोय...तो असता तर माझं काम सोपं झालं असतं. तो हंटर घेऊनच आला असता तुझ्यासाठी.

कल्पना : म्हणजे ? असा काय गुन्हा घडलाय् यांच्या हातून ?

पमा : देहान्त प्रायश्चित्त फर्मावण्यासारखं काही ?

भाऊ : मीनाच्या लग्नाला आपण सगळे इंदूरला गेलो होतो. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी पानाचं निमित्त करून तू कुठं गेला होतास ?

पमा : निमित्तबिमित्त काही नाही. तसं कारणच नव्हतं. पान खाऊन येताना रस्त्यात अचानकपणं सुधावहिनी दिसली.

भाऊ : तिचं नाव घ्यायचं नाही या घरात.

पमा : राहिलं.

भाऊ : पुढं बोल.

कल्पना : त्या 'घरी चल' म्हणाल्या—

भाऊ : त्याला बोलू दे—

पमा : आणि मी गेलो. संपलं.

भाऊ : सगळे शहाणेच एकेक ! घरी बोलावणारा एक मूर्ख आणि लगेच जाणारा शतमूर्ख. संबंध सुटले, नाती तुटली, तरी ओळख दाखवायची म्हणजे काय ?

पमा : हा तिचा प्रश्न. नाही का ?

आजी : तू पम्या, मला बोलला नाहीस काही.

पमा : दुसऱ्याला न रुचणारी गोष्ट मी कधी बोलत नाही, आई.

भाऊ : तुला कारणच काय तिच्याकडे जायचं ?

पमा : माझी आणि तिची गट्टी होती, साऱ्यांना माहीत आहे. ती दोन दिवसासाठी माहेरी गेली तरी मी रडत असायचो तेव्हा.

कल्पना : कबूल, पण एकदा अशा तऱ्हेनं संबंध संपल्यावर...

पमा : नात्याचे संबंध संपले तरी जीवाभावाचे संबंध कधी संपत नसतात, कल्पना.

कमा : नात्याचे तरी संबंध नाहीत ना ? मग त्यांना 'वहिनी' कशाला म्हणायचं ? आम्ही कुणीच नाही म्हणजे !

पमा : कमावहिनी, तुम्ही कुणीच नाही असा अर्थ कसा निघतो, सांगाल ?

कमा : त्यांच्याशी जीवाभावाची गट्टी, इथं माझ्याशी मात्र जेवढ्यास तेवढंच बोलणं. ते सुद्धा मी बोलले तरच !

पमा : याबाबत मी काही बोलू नये ते चांगलं. बोलण्यापेक्षा ऐकणाऱ्याला ते अवघड

वाटेल...वहिनी, गट्टी दोन्ही पक्षांकडून होत असते आणि ती आपोआप, सहज अशी होत असते. ठरवून नाही करता येत गट्टी.

भाऊ : मी गट्टी–फट्टी काही जाणत नाही. तू तिच्याकडे जाणं...

कमा : आधीच ठरलेलं असणार दोघांचं. मी सांगते ना ? भर दुपारच्या उन्हात नाहीतर ती कशाला तडफडायला घराबाहेर पडली होती ?

भाऊ : असलंच भटकण्याचं व्यक्तिस्वातंत्र्य हवं होतं त्यांना.

पमा : एक मिनीट. खरं सांगू ?

आजी : माझ्यासमोर बोलतो आहेस, विसरू नकोस.

पमा : आनंदा कुठं दिसतोय् का ते बघायला ती उन्हातून आली होती !

आजी : म्हणावं तरी काय या अगोचरपणाला ? सारं संपुष्टात आलं, दुसरा संसार मांडला—

भाऊ : आई, हेच हो ते व्यक्तिस्वातंत्र्य ! निर्लज्जपणा इथून तिथून...

पमा : प्लीज भाऊ, असलं काही न बोलशील तर बरं होईल.

भाऊ : एकदा का, दहादा बोलेन मी. मला कुणाची भीती नाहीए.

पमा : आणि मला मात्र तुमची साऱ्यांची भीती असावी ? तिला भेटायला जायला ? तिचं साधं नाव उच्चारायला ? मी काही बाळ नाहीए आता.
[ बाहेरून आनंदा येतो. वाद चाललेला पाहून गांगरून उभा राहातो. पमाचे त्याच्याकडे लक्ष नाही. ]
तिनं मला जुन्या मायेनं घरी बोलावलं आणि मला तिच्याकडे जावंसं वाटलं, तिच्याशी बोलावंसं वाटलं, म्हणून मी गेलो. दॅट्स् ऑल.

भाऊ : मोठे विद्वान ना तुम्ही ?

पमा : माणुसकी जपण्याइतका विद्वान मी नक्कीच आहे !

आजी : अरे, पण आपल्या घरादाराची प्रतिष्ठा ठेवायची म्हणून तरी तू ... तिकडे जाणं...

कमा : त्यांना काय हो प्रतिष्ठेचं ?

पमा : एक्झॅक्टली ! कसली प्रतिष्ठा कवटाळून बसला आहात ? मी तिला भेटल्यानं ती धोक्यात येत असेल तर ती साफ नकलीच म्हणायला हवी, नाही का ?

कल्पना : मी जरा बोलू का ? कधी नाही तो एवढयाशा गोष्टीवरून कशाला वाद घालताय् मोठ्यांच्याबरोबर ?

कमा : हो, तुला वाटणारच ही एवढीशी गोष्ट !

कल्पना : चुकलं, मोठी गोष्ट म्हणते मी. पण आता बाई हे वाद नकोत. भाऊसाहेब विचारताहेत त्याची सरळ उत्तरं द्या. चुकलं असेल तिथं माफ करून

घ्यायला सांगा. झालं. शिरा ताणून अगदी प्रतिष्ठेवर कशाला घसरायचं ?... आनंदा, तू चल बेटा आत. हातपाय धुऊन वाचत बस काहीतरी. ( आनंदाला घेऊन आत जाताना ) जवळपास कोण आहे, काही बघायचं नाही...बोलत सुटायचं आपलं....( आत जाते. )

पमा : ठीक आहे. विचारा प्रश्न. देतो सरळ उत्तरं.

भाऊ : तुला काय वाटलं, ही गोष्ट लपून राहील ?

पमा : अंहं ... असं नाही वाटलं.

आजी : तुला कुणी सांगितलं हे, भाऊ ?

भाऊ : सांगितलं ? लेखी पत्रच आलंय् मला ऑफिसात.

पमा : पत्रात 'मावा केक'ची जाहिरातसुद्धा असेल. ( हसतो )

भाऊ : तुला सांगतो. मला चिडीस आणू नकोस.

कमा : ( भाऊंना ) तिकडे काय बोलणं झालं, विचारा ना.

भाऊ : आम्हाला पोटभर शिव्या देऊन झाल्या असतील.

पमा : तुमचा विषयसुद्धा निघाला नाही. तिनं चौकशी केली फक्त आनंदाची, आईची आणि आमची दोघांची. अगदी मनमोकळेपणी.

कमा : पण चोरूनच ना ? घरात पुरुषमाणूस नसताना ?

पमा : केवढी उत्सुकता आहे तुम्हाला तिच्याबद्दल ऐकायची ! आणि तिनं कणभर सुद्धा उत्सुकता दाखवली नाही तुमच्याबद्दल...तुम्हाला सगळ्यांना एक धक्का देऊ ? या घरादाराचे आचार–विचार पार हादरून जातील मुळापासून ... आमचं मोकळेपणीचं बोलणं तिच्या नवऱ्याच्या देखत झालं !

कमा : आता खरंच धन्य झाली हो !

पमा : बसला ना धक्का ? ( हसतो )

भाऊ : तुम्हाला आनंद होणारच.

पमा : तिचं सुख बघून खरोखरच आनंद झाला मला.

कमा : इथं आत्ता दादासाहेब हवे होते. त्यांनी—

पमा : हवे होतेच. त्यांच्या हातातला हंटर गळूनच पडला असता.

आजी : पम्या —

भाऊ : तुला अखेरचं सांगतो, पम्या. ( आतून कल्पना येते ) तू एक तर आमच्याशी संबंध ठेव; नाहीतर तिच्याशी ठेव. ( कमाला ) चला आता. सांगायचं ते सांगून झालंय्...फितूर साले...( कमा आणि भाऊ आत जातात. )

[ स्तब्धता. ]

कल्पना : मी इतकं सांगितलं तरी तुम्ही वाद घातलात ना ?

पमा : आज ना उद्या हे घडणारच होतं.

कल्पना : पण निदान आईकडे बघून तरी—

आजी : तो एक तसा आणि हा असा ! बापा, आता या बुढीला अशी ही वादळं नाही सहन होत रे. जीव घाबरून जातो नुसता. हातपाय कापायला लागतात.

पमा : माफ करून दे आई. (तिच्याजवळ बसतो) पण तूच सांग, माझं काही चुकलं का सुधावहिनींकडे गेलो म्हणून ? भाऊला, कमावहिनीला वाटलं असेल वाईट, पण त्यांनी मोठ्या मनानं ते विसरून नाही का जायचं ? त्या आगलाव्या बाईच्या पत्राला एवढं महत्त्व द्यायचं ? मला बोलावून बायकोच्या देखत असं धारेवर धरायचं ? शोभतं का त्याच्या वयाला ?...पहिल्यापासून मी पाहिलंय, कमावहिनी माझ्याशी नेहमी वाकड्यातच शिरतात. असं काय घोडं मारलंय् मी त्यांचं ?

आजी : बाईलबुद्धीची घोडी मरतुकडीच असतात बघ ! आता विचारलंस म्हणून सांगते, कमाची भाची तुला सांगून आली होती. आठवतं ? तिला तू नकार दिलास ना ? तेच तिचं घोडं हो....आता तू तरी विसरून जा सारं. तू सगळ्यात धाकटा. मोठ्यांनी खेटरं मारली तरी खायची असतात धाकट्यानं. मोठ्यांना जबाबदारीचा भार आणि धाकट्याला खेटरांचा मार ! धाकट्याबद्दल खरी माया असते शेवटी या मोठ्यांच्याच मनात. हा भाऊच मघाशी म्हणत होता, युनियनपायी पमाची नोकरी गेली तर आम्ही मोठे भाऊ त्याला जन्मभर पोसू म्हणून...मनानं तुम्ही सारीच लेकरं चांगली आहात रे. माझ्यावर एवढा जीव लावता, एकमेकांसाठी झिजता .... फक्त तुमच्या डोक्यात राख कशी चटदिशी जाते !

(दरम्यान आतून आनंदा येऊन दारात उभा राहिलेला. हातात दप्तर.)

कल्पना : पण त्यांनी आत्ता दम दिला तो ऐकलात ना आई ? म्हणे एक तर आमच्याशी संबंध तोड—

आजी : तेवढंच अवसान त्याचं. ते या कानानं ऐकायचं आणि त्या कानानं सोडायचं.
(पमाचे आनंदाकडे लक्ष जाते.)

पमा : ये बेटा. (आनंद जवळ येतो). मोठ्यांचे वाद झाले तरी तुझी–माझी दोस्ती राहाणारच. (त्याचा पापा घेतो) तू सांग आई, ह्या पोराला तुम्ही किती दिवस असं दडपून ठेवणार ? उद्या मोठा झाल्यावर तो जाऊ शकतो त्याच्या आईकडे.

कल्पना : आता पुरे ना तो विषय ! भाऊसाहेब आले एवढ्यात तर ? चला आता घरी.

आजी : खरंच निघा बाबांनो ! पमा, स्कूटर जपून न्यायची.
(पमा, कल्पना नमस्कार करून जातात.)

[क्षणमात्र स्तब्धता.]

आनंद : पमाकाका माझ्या आईकडे गेला होता म्हणूनच चाललं होतं ना भांडण? सांग ना.

[स्तब्धता.]

आजी, तुला आठवते माझी आई? मला तशी नीटशी नाही आठवत. पण तरीदेखील अशी ना तशी आठवतेच बघ. ती दिसायला खूप छान होती ना?

आजी : हं...

आनंद : नुसतं हं, हं नको ग करूस. बोल ना काहीतरी तिच्याबद्दल...बोल... बोल ना!

आजी : पुन्हा आज काय हे भलतंच आणलं आहेस डोक्यात?

आनंद : मला तिची फार आठवण येतेय् ग आजी ... येणारच की नाही ग?... तुझ्या मुलांना कशी येत असते तुझी आठवण?... ए आजी, हल्ली रोज रात्री ती स्वप्नात येऊन मला हाका मारत असते. मग मी पंख लावून तिला शोधायला म्हणून उडत उडत जायला बघतो, तर ती कुठंच सापडत नाही मला....मला तिला पाहायचंय ग. तिला घट्ट मिठी मारून बसायचंय्...माझं कशातच लक्ष लागत नाहीए आजकाल...ती...ती मला भेटेल का ग?... सांगशील तरी?

आजी : देवाची इच्छा झाली तर भेटेलही, पोरा .... आता जास्त काही विचारू नकोस आणि बोलूही नकोस...माया लावते तो प्रत्येक जीव माझं काळीज असं कुरतडायलाच बघतो...(पदराने त्याचे तोंड पुसत) आता शहाण्यासारखा काही वाचत लिहीत बस... भाऊचा तुझ्यावर किती लोभ आहे, माहीत आहे ना? त्याला वाटतं, तू खूप शिकावं...मोठं व्हावं...

(आनंदाचा चेहरा विचारमग्न होतो. तो उठतो. दप्तरातून वही, पेन काढतो; मग—)

आनंद : आजी, आता तूही तुझ्या अभ्यासाला बस हं. (तिची जपाची माळ आणून तिच्या हाती देतो. दोघे हसतात.)

[आनंद पत्र लिहू लागतो—]

आनंदाचा आवाज : माझ्या लाडक्या आईस, आनंदाचा शिरसाष्टांग नमस्कार. आज इतक्या वर्षांनी तुला पहिल्यांदाच पत्र लिहितोय्. तुला वाटत असेल, आपला मुलगा आपल्याला विसरला. पण आई, हे कधी शक्य आहे का? मला लहानपणापासूनच तुझी आठवण येत असते— इतके दिवस आपण दूर दूर आहोत. पण आता मात्र तू प्रत्यक्ष दिसल्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणार नाही. असं वाटतं, तू जिथं असशील तिथं येऊन तुझ्या मिठीत शिरावं आणि मनसोक्त रडावं. असं वाटतंय्, तुला आज किती

लिहू आणि किती नको...

(भाऊ येतात. आनंदाला त्यांची चाहूल लागते. तो अभ्यासाचे नाटक करू लागतो.)

भाऊ : (आजींना) पम्या गेला?

(आजी मान डोलावतात.)

भाऊ : चौकात रस्ता खणून ठेवलाय्. त्याला स्कूटर जपून न्यायला सांगायला हवं होतं.

आजी : बजावलंय् मी त्याला.

आनंद : (मुद्दामच) भाऊ, 'ॲप्रिसिएट'चं स्पेलिंग काय हो?

भाऊ : ए–डबल् पी–आर–ई–सी–आय्–ए–टी–ई

(आनंद लिहू लागतो असे पाहून आत जातात.
आनंद त्यांना बघतो. पुन्हा पत्र लिहू लागतो.)

आनंदचा आवाज : इथं आजी, भाऊ, आई आणि सर्व जवळची माणसं असूनसुद्धा त्यात तुझी उणीव भासतच असते, बघ! मी दूर असल्यामुळं तुझ्यादेखील मनाला किती त्रास होत असेल ग! पण तू काही काळजी करू नकोस की मनाला लावून घेऊ नकोस. आता मी काही लहान राहिलेलो नाही. परवानगीनं तुला मी केव्हाही भेटू शकतो. पण त्या आधी परवानगी काढत बसण्यापेक्षा तूच लौकरात लौकर येऊन मला भेट.... आता मी दहावीत गेलो आहे. नववीत मला एकूणसाठ टक्के मार्क्स मिळाले असून कॉमर्स हा माझा विषय आहे. त्यामध्ये मला डिस्टिंक्शन मिळालं आहे. तुझ्या आठवणीनं माझं कशातही लक्ष लागत नाही, म्हणून तू मला लगेच येऊन भेटच...मी जर पक्षी असतो तर किती बरं झालं असतं! लागलीच उडत येऊन तुला भेटलो असतो....

[पत्र चालू असताना प्रकाश कमी होऊ लागतो.
काळोखसुद्धा होतो. काळोखात पत्र चालू राहाते.]

आनंदचा आवाज : माईची सुलू म्हणते, तू दिसायला सुंदर आहेस. जाहिरातीतल्या बाई-सारखी...आजी आमच्या घरी असली की मी तिच्याजवळच झोपतो. एक दिवशी तुझ्या आठवणीनं रडत होतो, तिनं सहज अंगावर हात टाकला आणि माझा जीवच कोंडला. एकदम इतकं रडू फुटलं... पण आवाज होईल म्हणून तोंडात चादर कोंबून घेतली, तरी कोंडलेला आवाज निघालाच. मग तिनं मला सगळं विचारून घेतलं. तिला पण रडू यायला लागलं. दुसऱ्या दिवसापासून ती आजारीच झाली. काय झालं ते मला एकट्यालाच माहीत आहे. पण आई, मी केलंय् का तिला

आजारी ? माझा जीव कोंडला मग मी कुणाजवळ बोलणार ग तिच्याशिवाय ?... म्हणून म्हणतो, तू ताबडतोब निघून ये. आधी पत्र पाठव आणि तुझा फोटो पण पाठव. आई, मागं पमाकाकानं माझा गच्चीवर नेऊन फोटो काढला, तो तुलाच पाठवला ना ? आज किनई, पमाकाकाचा भाऊंशी आणि इथल्या आईशी खूप वाद झाला. तेव्हा तो जाताना म्हणाला, उद्या मोठा झाल्यावर काही तुम्ही त्याला असं दडपून ठेवू शकत नाही. तो जाऊ शकतो त्याच्या आईकडे. त्याचाच आधार घेऊन मी पमाकाकाकडून तुझा पत्ता मिळवून तुला हे पत्र टाकणार आहे.

[ दृश्य संपते. ]

## दृश्य : तिसरे

[ इंदूरचे सुधाचे घर. सुधा आनंदाचे पत्र वाचत आहे. ]

आनंदचा आवाज : तू दिसशील तेव्हाच आता मला चैन पडणार आहे. तसा मी अगदी आनंदात असतो. भाऊ माझे लाड करतात. अजून माझा बस्ता लावून देतात आणि जोडे पॉलीश करून ठेवतात. इथली आई पण खूप चांगली आहे ग. माझ्या खाण्यापिण्याची आवड सारखी जपत असते. सांगायचं एवढंच, की सर्व असूनही तुझ्यावाचून ते फुकट आहे ग !

( सुधा चष्मा काढून डोळे टिपते. क्षणभराने पुन्हा पत्र वाचू लागते, मनातल्या मनात. पत्र वाचून पूर्ण करते. पुन्हा चष्मा काढून डोळे टिपते. विचारांत दंग राहाते.
दाराची बेल वाजते. सुधा घाईघाईने पत्र लपवते.
जाऊन दार उघडते. दारात माणिक. )

सुधा : माणिकताई, तुम्ही ?

माणिक : ( तिचा त्रासिक चेहरा पाहून ) का ग ? काही कामात आहेस ?

सुधा : अं ?...कामात अशी नाही, पण...आत्ता नुकतीच येतेय् ना ऑफिसातून ? फार दमायला झालंय् आज.

माणिक : एक पाचच मिनिटं बसून जातेय मी. तहान लागली, म्हटलं, तुझ्याकडे जाऊन पाणी प्यावं आणि निघावं.
(सुधा नाइलाजाने आत जाते. माणिक बसते.
सुधा पाणी आणून देते.)

माणिक : (पाणी पिऊन) बॉंबे बेकरीत आज मावा केक मिळालेच नाहीत. मग वेफर्स मिळाले तेच घेतले....तू बस ना.

सुधा : नाही. आल्यापासून अजून तोंडसुद्धा धुतलेलं नाही.

माणिक : (पुडीतून वेफर खात) अगदी फ्रेश आहेत. बॉंबे बेकरी म्हणजे प्रश्नच नाही...ही ठेवून घे पुडी. तुझ्यासाठीच आणली आहे.

सुधा : कशाला ? मला भूक नाहीए. डोकंही फार दुखतंय्.

माणिक : (उठत) मग निघते मी.

सुधा : तसं नाही, पण थोडी विश्रांती घेणार होते मी.

माणिक : मी आले होते, फक्त तुझा गैरसमज काढायला.

सुधा : छेः गैरसमज वगैरे काही नाही.

माणिक : मग माझ्याकडला जेवणाचा प्रोग्रॅम का कॅन्सल केलास रविवारचा ?

सुधा : त्या रविवारी ऐत्या वेळी ऑफिसचं काम निघालं, माझ्या. तसं मी सांगितलं-सुद्धा नव्हतं का फोनवर ?

माणिक : ए, माझ्याशी नाही हं खोटं बोलायचं. इथं इंदूरला तुझा मुलगा आल्याचं मी तुझ्याजवळ बोलले तेव्हापासून तू रागावली आहेस माझ्यावर. पण मी ते का बोलले हे ऐकलंस तर राग गेल्याशिवाय राहणार नाही तुझा.

सुधा : जाऊ दे. नशिबात भेट नव्हतीच.

माणिक : नाही...नाही...तू ऐकून घेतल्याशिवाय मी जाणार नाही. अग, शांतीताई म्हणजे महा खत्रूड. मला म्हणते कशी ? आनंदा आल्याचं, त्या गधडीला कळलं तर ती कार्ऱ्याला भेटायला येईल आणि मग मी सार्‍यांच्यादेखत तिची कशी करते ते बघ. (सुधावर होणारा परिणाम बघत) तर तू तिकडे जाऊ नयेस म्हणून मी तुझ्या आईजवळ बोलले. तुझी आई तरी काय ? म्हणाली, मी काही आनंदाचा विषय काढणार नाही सुधाजवळ. ती आणि तिचं कर्म ! मग मीच बोलायला हवं होतं की नाही तुझ्याजवळ ?

सुधा : प्लीज, माणिकताई–

माणिक : चुकलं असेल माझं तर खेटर मार तू. अग, एकाच गावात राहायचं आणि

गैरसमज कशाला ते रिकामे ?...तेव्हापासून झोप नाहीए बघ मला.

सुधा : पण माझा गैरसमज झालेलाच नाही!

[स्तब्धता.]

माणिक : (काही वेळ वेफर्स खाऊन, मग) एक विचारू का ग तुला ?...तुला तुझ्या मुलाची आठवण येत असणारच. हो की नाही ? त्या लोकांचं म्हणणं काय ? तू दुसऱ्या संसारात रमली आहेस, आता कशाला तुला मुलाची आठवण येणार ?

सुधा : ते काही का म्हणेनात, त्या लोकांशी आता संबंधच काय माझा ?

माणिक : माणसं हलकटच बघ तिकडची. कधी भेट घालू दिली तुमची दोघांची तर काय, इकडची दुनिया तिकडे होणार आहे ? मीनाच्या लग्नाच्यावेळी मनात एक विचार आला होता, माझ्या. तुला माझ्या घरी बोलवायचं आणि तुझ्या मुलालाही तिकडे आणून तुमची भेट घालून द्यायची...एवढं तरी तुझ्यासाठी करायला नको होतं मला ?

सुधा : तुम्हाला तसं...जमलं असतं ?

माणिक : अगदी सहज.

सुधा : मग बोलला का नाहीत मला तेव्हा ?

माणिक : व्या. तेच बोलायला म्हणून आले होते ना तेव्हा ? तर तिथं सतीश आणि पम्या...चुकलंच बघ, तुला हळूच फोन केला असता तर चुटकीसरशी झालं असतं हे.

[स्तब्धता.]

माणिक : पोरगा कसला गोड दिसतो तुझा! आणि हुषारसुद्धा वाटला बोलण्यात.... अशा मुलापासून इतकी वर्षं दूर राहायचं म्हणजे. मुलाबद्दल बोललेलं चालेल ना तुला ? हो, नाहीतर पुन्हा गैरसमज व्हायचा.

सुधा : बोला हो. आवडतं मला त्याच्याबद्दल बोलायला, ऐकायला.

[स्तब्धता.]

माणिक : (डोळे टिपत) आनंदाला तुझ्याबद्दल काही माहिती आहे की नाही, कुणास ठाऊक! मी पुढल्या आठवड्यात नागपूरला जातेय्. तू मला आनंदासाठी पत्र लिहून दे. मी ते गुपचूप त्याला देईन. कळेल तरी त्याच्या मनात काय आहे ते.

सुधा : (एकदम) तुम्ही कुठं बोलणार नाही ना ? तुम्ही आलात तेव्हा त्याचंच पत्र वाचत होते मी. इतकं कळवळून लिहिलंय् पोरानं! इतके दिवस वाटायचं, हा फक्त माझाच भोग आहे. यात कुणीही भागीदार नाही. पण पत्र वाचल्यापासून वाटतंय्, या दुःखात आनंदादेखील आपला बरोबरीचा

भागीदार आहे.

माणिक : हेच बरं रक्ताचं नातं म्हणतात ते !....बघू दे तरी पत्र. मी अगदी माझ्याजवळ ठेवते ही गोष्ट. म्हणालीस तर माझ्याकडून होईल तेवढी मदतसुद्धा करीन. (हात पुढे करत) दे ना. प्लीज. निदान वाचून तरी दाखव एखादं पान.

(सुधा क्षणभर विचार करते. मग पत्रातला मजकूर वाचायला घेते.)

सुधा : शेवटचं वाचून दाखवते हं. (पत्र वाचू लागते) सांगायचं एवढंच की सर्व असूनही तुझ्याचून ते फुकट आहे ग! 'स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी' अशी माझी अवस्था आहे बघ. तरी तू इकडे येच. मी वाट बघतोय. एक सांगायचं राहिलंच. मला पमाकाकासारखी बासरी वाजवता येते. त्याचीच बासरी मी वाजवतो. तू आलीस की तुला मी नवीन नवीन गाणी वाजवून दाखवीन. तुझ्यासाठी खास बसवलेली. तुला आवडतीलच अशी. तुझा लाडका : आनंद. ताजा कलम : आई ग, पत्र लिहिल्यावर आता खूप बरं वाटतंय्. जीव मोकळा झाल्यासारखं. तुझाच तुझाच आनंद. पुन्हा ताजा कलम : तू नक्की येच. मी वाट बघतोय म्हणून तू येशीलच अशी खात्री आहे. तुझा आनंद म्हणजे मीच. आनंद.

(माणिक अधूनमधून उगाच हुंदके देते. 'अयाई' म्हणते. मग–)

माणिक : पत्र कुठल्या-याच पत्त्यावर आलंय ?

सुधा : नाही. माझ्या ऑफिसच्या पत्त्यावर. पमानं दिला पत्ता त्याला.

माणिक : ते एक बरं झालं हो. हो, नाहीतर इथं पत्र येऊन ते सतीशना मिळतं तर ? कितीही चांगला असला तरी शेवटी पुरुषच तो ! त्याच्या मनाला दंश होणारच.

[स्तब्धता. क्षणभराने–]

ते परवानगी देतील तुला नागपूरला जायला ? आजवर बोलली नसशील तर एकदा या विषयावर स्पष्ट बोलून घे त्यांच्याशी, पाऊल पुढं टाकण्यापूर्वी. उद्या कधी पोराला जवळ ठेवून घ्यायची वेळ आली तर ? स्त्रीनं सावत्र आईची भूमिका युगायुगांपासून बरीवाईट कशी का होईना, निभावलेली आहे. पण सावत्र बाप आपल्या समाजात तरी कुणी पचवलेला नाही ! (दाराची बेल वाजते) बघ, सत्य आहे.

(बाहेरून सतीशची 'सुधा' अशी हाक)

सुधा : हेच आले वाटतं. त्यांच्याजवळ तुम्ही हा विषय काढू नका. त्यांचा मूड पाहून मी बोलेन त्यांच्याशी. शेवटी ते सांगतील तेच ऐकणार आहे मी.

(सुधा दार उघडते. सतीश येतो.)

सतीश : ( माणिकला ) नमस्कार.

माणिक : खूप दिवसात भेट नव्हती सुधाची. म्हणून आले आज वेळात वेळ काढून गोष्टी करायला.

सतीश : बरंच झालं. मलाही उशीर झाला यायला ! बँकेत आज ट्रान्स्फर्स आल्या आहेत ना स्टाफच्या ? मग झाल्या चर्चा सुरू.

सुधा : आपली ट्रान्स्फर ब्रिन्स्फर नाहीए ना त्यात ?

सतीश : बरीचशी शक्यता आहे.

माणिक : लगेच होतेय ?

सतीश : तरी तीनेक महिने आहेत. अर्थात् झाली तर...

सुधा : कुठं होणार झाली तर ?

सतीश : मुंबईला. हेड ऑफिसला. प्रमोशनही मिळेल बहुतेक.

माणिक : काँग्रॅच्युलेशन्स !

सतीश : थँक्यू.

( सुधा विचारात...स्तब्धता. )

ए वेडे, तू एव्हापासूनच काळजीत का पडतेस ? जावं लागलं तर जाऊ की ! आणि डिलीव्हरीसाठी तू नाहीतरी बडोद्यालाच जाणार आहेस माहेरी.

सुधा : नाही त्यासाठी नव्हते म्हणत.

माणिक : मी सांगते. हिला हिच्या नोकरीची चिंता पडलीय्. असंच ना ?

सुधा : हो...हो. म्हणूनच विचारात पडले होते. ( माणिककडे आभारार्थी बघते. मग ) तुम्ही बसताय बोलत ? मी आत जाऊन तोंडबिंड धुऊन येते. जरा फ्रेश वाटेल. ऑफिसातून आले तशीच बसलेय् माणिकताईंशी बोलत.

( सुधा आत जाते. )

सतीश : काय एवढया गोष्टी चालल्या होत्या दोघींच्या ?

माणिक : सुधा मूडमध्ये कुठं होती ? मीच आपली बडबडत होते.

सतीश : मूड जायचं कारण ?

माणिक : नागपूरला जायचं ठरवलंय ना तिनं ?

सतीश : नागपूरला ? कशाला ?

माणिक : आनंदाला भेटायला. पत्र आलंय त्याचं लगेच येऊन भेट म्हणून. तिच्या ऑफिसच्या पत्त्यावर धाडलंय त्यानं. मी तिला म्हटलं, आधी तुमच्याशी बोल आणि मग ठरव काय ते. भावनेपोटी अविचारानं काही करायचं आणि ना इकडे सुख, ना तिकडे समाधान असं व्हायचं. ( सतीश विचारात ) ती बोलली नाही तरी तुम्ही विचारावं म्हणून बोलले हो मी...एकदा पाश तोडलेत ना ? संपलं. आता कशाचा आलाय कुठला संबंध ?

सतीश : पण त्यानं इतकं लिहिलंय तरी काय पत्रात ?

माणिक : शाळेतल्या पोराचंच पत्र हो. त्यांना अभ्यासात निबंध लेखन तसं पत्रलेखन असतं. त्यातलंच हे पत्र. त्याला महत्त्व ते किती द्यायचं ? मला विचाराल तर तिला 'जायचं नाही' म्हणा. हो, नाहीतर नवीन गुंता निर्माण व्हायचा नव्या संसारात. ( आतून सुधा येते )
नव्या संसारात असंच सांभाळायचं असतं एकमेकांना...हिला बरोब्बर माहीत आहे.

सुधा : पुरे हो कौतुक.

माणिक : मी निघते आता. मागलं जेवायचं आमंत्रण अजून अंगावर आहे हं तुमच्या. आता तुम्ही फोन करायचा आणि कळवायचं...सुधा, तू ये ना कधीतरी माझ्याकडे गोष्टी करायला. मी घरीच असते. बरंय्, निघू ? इथं आले की खूप बरं वाटतं मला.
( निरोप घेऊन जाते. क्षणभराने- )

सतीश : तू काय नागपूरला जाते आहेस, सुधा ?...माणिकताईनीच सांगितलं मला. तुझं नक्की झालंय ? त्याचं पत्र आलं आणि तू परस्पर निर्णयसुद्धा घेऊन टाकलास ?

सुधा : नाही हो. तुम्ही परवानगी दिलीत, तरच.

सतीश : समज, मी नाही दिली परवानगी, तर ?

सुधा : नाही जाणार मी. घशातला हुंदका तसाच कोंडून ठेवीन मी.

सतीश : तुला त्याला भेटावंसं वाटणं मी समजू शकतो. तेव्हा तुला त्याला फक्त पाहायचं होतं. मी संमती दिली. आता मला न विचारतासवरता तू नागपूरला त्याच्या घरी जाणार. तिथल्या परिस्थितीचा काही विचार केला आहेस ? तुमची भेट झाली, तो पोरगा बिथरला, तुझ्याबरोबर त्यानं यायचा हट्ट धरला, तर ? तुला मागल्या पाशातून मोकळं व्हायचंच नाहीए का ? तुझ्याबरोबर माझीही परवड करायचीय् तुला ? का ? कशासाठी ? इतकी वर्षं तुझं मन जपत आलो त्याचं प्रायश्चित्त म्हणून ?

सुधा : नाही हो. मी नुसती त्याला भेटणार आणि लगेच परत येणार आहे. त्याचीही तेवढीच इच्छा आहे. वाटल्यास तुम्ही चला माझ्याबरोबर.

सतीश : म्हणजे तुझा निश्चय ठाम आहे जाण्याचा ! सुधा, मला तुझं हे वागणं योग्य वाटत नाही. या साऱ्या चक्रात फिरताना तू माझा जरासुद्धा विचार केलेला नाही आहेस. माझा केलेला नाहीस आणि तुझा स्वतःचाही केलेला नाहीस. तुझ्या आताच्या या स्थितीत डॉक्टरांचा विश्रांतीचा सल्ला धुडकावून तू एकटी इतक्या लांब जाणार. तिथं त्या लोकांनी नाही तुमची भेट होऊ दिली, तुझा

वाटेल तसा अपमान केला तर तुला तो सहन करता येईल ? आणि तू का सहन करावास तो ? संबंध तोडल्यानंतर ? नुसत्या कल्पनेनंच माझ्या अंगाचा संताप होतोय्. भावनेच्या आहारी जाऊन आगीत उडी घेते आहेस तू. ज्यांनी तुझ्यावर आयुष्यातून उठण्याची वेळ आणली त्यांच्या घरी लाचार होऊन तू जाणार आहेस ?

सुधा : मी त्यांच्या घरी जाणार नाहीए. गेलेच तर पमाकडे जाणार आहे. तिथं तो आनंदाला घेऊन आला तरच भेट घडणार आहे आमची. उद्या बदली होऊन आपण मुंबईला गेलो तर आणखी किती वर्षं हा दुरावा, हे दुःख मला वाळगावं लागेल, कुणी सांगावं ?

सतीश : अजूनही तू फक्त स्वतःपुरताच विचार करते आहेस. त्यांचे–तुझे संबंध संपले तेव्हा हा दुरावा कायमचा म्हणून गृहीतच धरला होता ना ? वर्षांचा प्रश्न इथं येतच नाही. आयुष्यात आली अशी संधी कधी अचानक त्याला भेटायची, तर ती तू जरूर घे. पण आत्ताचा नागपूरला जाण्याचा तुझा विचार मला केवळ वेडेपणाचा वाटतोय्.

सुधा : पण त्याचं पत्र आलंय्...पोरगा माझ्या भेटीसाठी तिकडे तडफडतोय्. त्याला इथं येणं शक्य नाहीए...मग मलाच नको का त्याच्याकडे जायला ?

सतीश : माझं ऐक. तू पमाच्या पत्त्यावर त्याला एक पत्र पाठव. सर्व परिस्थिती त्याला कळव आणि त्याची समजूत घाल. खरं तर हा पत्रव्यवहार वाढण्याचीही मला भीती वाटतेय.

सुधा : ( पत्र आणून देत ) त्याचं हे पत्र तुम्ही वाचा आणि सांगा, त्याला नुसतं पत्र पाठवून चालेल का ते.

सतीश : त्यानं खूप लिहिलं असेल. शाळेत जाणारा मुलगा तो. पण आपण आपला विचार प्रथम करायला नको ?

सुधा : पण त्याचं पत्र वाचून बघायला काय हरकत आहे तुमची ?

सतीश : त्यानं तुला लिहिलंय् ते पत्र. पत्र वाचून तुला जेवढा कळवळा आला तो मला येणं कधीच शक्य नाही !... आणि सुधा, आपल्या संसाराच्या माझ्या कल्पनेत मी, तू आणि आपली मुलं एवढीच फक्त आहेत. तूदेखील आपल्या सुखासाठी एवढयांचाच विचार केलास तर ते अधिक हिताचं ठरेल असं माझं स्पष्ट मत आहे !...मी आल्यापासून तू मला चहासुद्धा विचारला नाहीस. तू करणार आहेस की मीच आत जाऊन करून घेऊ चहा ?

( सुधा चकित. तशीच उभी. सतीश आत जातो. )

( दुसरा अंक समाप्त )

म. प्रं. सं. ठाणे, वाचनालय शाख
दा. क्र.............. नों. दि ........
वि. .................. क्र. ..........

# अंक ३ रा

## दृश्य पहिले

[ नागपूरचे भाऊंचे घर. वेळ : दुपारी चार नंतरची.
आजी व्यंकटेशस्तोत्र वाचत बसलेली. दार उघडेच आहे.
स्कूटरचा आवाज. पमा आणि कल्पना येतात. ]

आजी : कोण– पमा का रे ?

पमा : (इकडे तिकडे बघत) मातोश्री, आज घरात अगदी सामसूम ? भाऊ ऑफिसला गेला असेल, पण कमावहिनी ?

आजी : तिच्या वडलांचा आज साठीसमारंभ आहे म्हणून दोघं तिकडेच गेलेत. भाऊनं रजा काढलीय् आजची.

कल्पना : आणि आनंदा ?

आजी : गेलाय् त्यांच्याचबरोबर. पण तो जेवून लगेच शाळेत जाणार आहे परस्पर.

कल्पना : आम्ही दोघं सोडून, सगळ्या नातेवाईकांना समारंभाचं आमंत्रण अगदी आग्रहानं गेलंय.

पमा : आपण दोघं कमावहिनींच्या काळ्या यादीत ना ?

आजी : आपल्या बाजूनं आपण भांडण विसरून जावं.

कल्पना : आम्ही तर केव्हाच विसरलो आहोत ते. नाहीतर आलो असतो आज ?

आजी : मग भाऊ आणि कमा असताना यायचं. भांडणाची धार तेवढीच बोथट होत जाते, बाबांनो !

पमा : आता सांगू का, आई ? ती दोघं घरी नाहीत हेच पथ्यावर पडलंय् आमच्या, म्हणून आलोय्. कल्पनेला आणि तुला, दोघींनाही पटवून द्यायचंय.

आजी : काही गोंधळ बिंधळ आहे का रे ?

पमा : केला तर प्रचंड गोंधळ, डोकी शांत ठेवली, साऱ्यांनी मनातली कोळिष्टकं काढून टाकली तर सगळं सोपं, सुरळीत .. तुला आता हिंमत ठेवून मला मदत करावी लागणार आहे.

आजी : कोड्यात नको बोलूस. जीव धसकतो माझा.

कल्पना : तसं अगदी धसकण्यासारखं नाहीए, पण...

पमा : ती उद्या येतेय् माझ्याकडे.

आजी : कोण ?

कल्पना : आनंदाची खरी आई. आनंदानंच पत्र टाकून बोलावलंय त्यांना ताबडतोब.

पमा : सकाळीच तिचं पत्र मिळालं. मग घेतली रजा.

आजी : हे रे काय लक्षण ? मांडलंय काय तुम्ही साऱ्यांनी मिळून ? काय खूळ भरवताय् तरी त्याच्या डोक्यात ? माईच्या सुलूनं आधी ही आग लावली. ती कार्टी एक अगोचर म्हणते मी, पण तुला तरी विचार करायला हवा होता. निदान मला आधी नको होतं सांगायला ? अगदी ती उद्या टपकतेय् तर आज सांगायला आलास तो ?...आणि मी म्हणते, आता सर्व झाल्यागेल्यावर तिची हिंमत कशी होतेय् सरळसरळ तुला पत्र लिहून तुझ्या घरी येऊन उतरण्याची ?

कल्पना : तसं पाह्यलं तर आता काय संबंध आहे ?

पमा : तिचा आणि आपला नसेल, पण आंदूचा आणि तिचा तरी आहे ना संबंध ? आंदूनंच तिला पत्र पाठवून बोलावून घेतलंय्.

आजी : त्याच्याकडे तिचा पत्ता कसा आला ?

कल्पना : ह्यांच्याशिवाय दुसरं कोण देणार ?

पमा : 'मला माझ्या आईचा पत्ता दे' म्हणून आंदू माझ्या ऑफिसात येऊन हटूनच बसला. मग मला आठवला तसा तिच्या ऑफिसचा पत्ता मी त्याला लिहून दिला. आंदूनं पत्र टाकलं आणि म्हणून ती त्याला भेटायला येतेय्.

आजी : पण तेव्हा माहेरी निघून गेली त्यावेळी ताठा तिचाच होता. एवढं होतं पोराचं तर करती एकासारखी तडजोड. पण पक्की बाजिंदी निघाली ! मी तर इतकं कौतुक केलं तिच्या रूपागुणाचं की कुणी पोटच्या पोरीचं काय करील ? पण स्मरलं का तिनं ?

पमा : तो विषय आता निरर्थक आहे. सुधावहिनीनं तब्बल बारा वर्षं हा दुरावा सोसलाय्, तुमच्या दुराग्रहापायी. पण आता या क्षणाला त्या मायलेकरांमध्ये अडथळा आणण्याचं पाप मी करणार नाही. मला करता येईल ते करीन मी त्यांच्यासाठी.

आजी : तू हा घाट घातलासच का, म्हणते मी.

पमा : मी नाही ग घाटबीट घातला. आपल्या पोरानंच केलंय् सर्व. मी विचारतो, इतकी वर्षं गेली, ती आली कधी तुमच्या दाराशी ? मीनाच्या लग्नाला भाऊ आणि कमावहिनी त्याला इंदूरला घेऊन गेली होती. तिला ते कळलं होतं.

तिचा जीव काय तडफडला नसेल ? आपल्याच गावात आपला पोरगा येऊन त्याची भेट होऊ नये म्हणून ? पण आली होती का ती त्याला भेटायला ? एक विचारतो आई, तुला. बाजूची परिस्थिती कितीही बदलली असली, कायद्यानं सारी नातीगोती संपवून टाकलेली असली, तरी तीच आनंदाची आई आहे हे सत्य तुम्हाला बदलून टाकता येईल का ? आपल्याच पोरानं सिद्ध करून दाखवलंय् की त्याचं आणि तिचं नातं ! कसं लिहिलंय् त्यानं पत्र तिला. पत्रात कुणाबद्दल वाईट शब्द नाही...कमावहिनींचं खुल्या मनानं कौतुक केलंय् पोरानं.

कल्पना : आपल्या पत्राबरोबर त्याच्याही पत्राची कॉपी करून पाठवली आहे...

पमा : आई, पुरुषासारखा पुरुष मी, पण त्याचं पत्र वाचून हालून गेलो. ती तर बोलूनचालून त्याची आईच.

[ स्तब्धता. ]

आजी : काहीतरीच घोळ घालून ठेवलाय् पोट्ट्यानं. मी बोलले नाही बापा, कुणाजवळ. पण त्यामुळंच माझं ब्लडप्रेशर वाढलेलं आहे. भाऊ-कमाच्या लग्नाच्या वाढदिवशी पोराची समजूत घालता घालता माझा जीव सुकला. त्याचा चेहरा असा चिमणीसारखा झाला होता की वाटलं, भाऊला म्हणावं, नेऊन आण एकदा त्याला तिकडे. माया मोठ्ठी वाईट असते रे !

पमा : वाटलं ना तुलाही एकदम असंच ? मग मला का दोष देतेस ? त्या दिवशी ऑफिसमध्ये म्हणाला, मला तिला पत्र पाठवायचंय्. खूप आठवण येतेय् तिची. मग चुकलं मी त्याला पत्ता दिला ते ?

( आजी रडू लागतात. )

कल्पना : असं करून कसं चालेल ? आम्हाला आधार तर तुमचाच आहे आता.

आजी : त्या मायलेकरांना तर भोगावं लागतंय्. आपल्याला इतकं तर सहन करायलाच लागेल ना ?

पमा : तिचं मला आलेलं पत्र वाचून दाखवू ?

आजी : वाच बाबा. वाच.

पमा : ( पत्र वाचू लागतो ) प्रिय पमा, माझ्या अनपेक्षित पत्रानं तू आश्चर्यात पडशील. सोबत आनंदानं मला पाठवलेल्या पत्राची नक्कल करून पाठवत आहे. त्यावरून तुला सारा उलगडा होईल. मी एकवीस तारखेला इथून निघून बावीसला तुझ्याकडे येत आहे. कबूल केल्याप्रमाणे तू त्याचा फोटो पाठवलास तो मिळाला. 'तो मोठा झाल्यावर आपण होऊन तुझ्याकडे येईल' हे तुम्ही प्रत्येकानं काढलेले आशीर्वादात्मक उद्गार खरे झाले आहेत. तो माझ्याकडे यायचा दिवस अजून दूर आहे....आईला भेटायची

गरज त्या निर्व्याज पोराला जाणवली, पण मोठ्यांनी मात्र तिचा विचारसुद्धा अहंकाराखातर दडपून टाकला. त्यामुळं मी स्वतःचं मन खूप कोंडलं... खूप दडपलं आणि खूप सोसलं रे...तब्बल बारा वर्षं ...(हुंदका दाटतो)... पुढलं तूच वाच आई ...( आजीजवळ पत्र देतो. )

(आजी चष्मा लावून पत्र वाचू लागतात :)

सुधाचा आवाज : तब्बल बारा वर्षं अक्षम्य अपराध करणाराही इतक्या शिक्षेनंतर मोकळा होऊ शकतो. एका पुरुषाच्या अहंकाराला धक्का लावणं हा अपराध इतका मोठा ठरतो का की त्यासाठी इतकी कठोर शिक्षा व्हावी ? अजूनही माझ्या शिक्षेची मुदत संपलेली दिसत नाही. त्यानं पत्र टाकावं आणि मी येऊन भेटावं एवढा सोपा हिशेब होणार नाही. आमच्या दोघांबरोबर तुझाही पिट्टा पडणार आहे. कारण मायलेकरांची ही भेट तुझ्या साक्षीनं, तुझ्या वास्तूमध्ये घडून येणार आहे. वातावरण फारच तापलं तर तुझी आई तुला पाठीशी घालायला खंबीर आहे, पण त्याची आई त्याच्याबरोबरच गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभी आहे.

[ आजी पत्र दूर करून चष्मा काढतात. डोळे टिपतात. काही क्षण स्तब्धता. आजी पुन्हा पत्र वाचू लागतात : ]

सुधाचा आवाज : पण मी आता करू तरी काय शकते ? तुला मी नक्कीच अडचणीत आणत आहे. धाकटा म्हणून साऱ्यांचा तू लाडका असलास तरी मोठ्यांचा अहंकार दुखवून, मला आपल्या घरी उतरवून घेण्याचा तुझा निर्णय कुणीही खपवून घेणार नाही. अर्थात् आता जे व्हायचं ते अटळ आहे. तुला एक शंका असेल तर दूर करते. अत्यंत समजूतदारपणानं, सतीशनी मला ही परवानगी दिलेली आहे. त्यांना मुख्य काळजी आहे, तिकडे कुठल्या अप्रिय प्रसंगाला तोंड द्यावं लागलं तर माझा कसा निभाव लागेल, याची. आनंदाला मी येते आहे याची पूर्वकल्पना देणं इष्ट वाटत असेल तर तशी दे. वेडा मुलगा ! येण्यापूर्वी फोटो आणि एक पत्र पाठव म्हणून मला लिहितोय् . त्याला सांग, पत्रात आणि फोटोत तुझी आई मावणार नाही रे आता... आणि हो, तुझ्या कल्पनेला अगत्यपूर्वक विचारलंय् म्हणून सांग. तुझी सुधाताई.

( आजी पत्र मिटून डोळे टिपतात. )

[ स्तब्धता. ]

पमा : लहान मुलं बघ किती मनात ठेवतात ते ! ...मला तर असा रंग दिसतोय् की त्याच्यावर हे दडपण असंच राहिलं तर एक दिवस कुणालाही न सांगता सवरता तो सरळ गाडीत बसेल ! मग एकेकाचं धाबं दणाणेल. आणि

तुम्हालाच जावं लागेल तिच्या दाराशी.

आजी : खरं आहे बाबा, तुझं. पण इथं डोकी एकेकाची कशी आहेत तुला माहीत आहे ना? पटवायचं कुणी कुणाला? आधी त्या लेकरावरच खवळायचे सारे...

कल्पना : आणि दुसरा नंबर ह्यांचा. हे तर त्यांना घरीच उतरवून घ्यायला निघाले आहेत ना?

पमा : मला काय बोलायचं ते खुशाल बोलू देत, ग. ह्यावेळी तर मी त्या दोघांच्याच बाजूनं उभा रहाणार!

कल्पना : घरून बरी परवानगी मिळाली, मी म्हणते त्यांना?

पमा : खरं तर तिच्या नवऱ्याचा काय संबंध तसा? पण आली ना त्यालासुद्धा कणव? ह्यावेळी आई, तुम्ही पण तिच्यावरचा राग विसरा.

आजी : आता कसला आलाय् राग आणि लोभ? संपला तिचा आणि आपला ऋणानुबंध...पण त्या दिवशी कधी नव्हे ती स्वप्नात आली बघ–

पमा : अग, आता तिची सारी मदार तुझ्यावरच नाही का? तूच ठरव आता तिला रिकाम्या आणि निराश मनानं परत पाठवायचं का ते.

आजी : आता नको तसं...होऊन जाऊ दे मायलेकरांची भेट. मी सांगते दादा–भाऊला नीट समजावून. आधी दादाला भेटते, मग भाऊशी बोलते... या वयात ही कृष्णशिष्टाई झेपली पाहिजे. कापरं तर भरतंच आहे तसं अजून.

कल्पना : तुम्ही आधी स्वतःला जपा. नाहीतर सगळे यांच्यावरच टापरणं ठेवतील तुमची तब्येत बिघडवल्याबद्दल.

पमा : मी तर म्हणतो, तू आई, कुणाला काही न सांगता, काहीतरी निमित्त काढून इथून आंदूला माझ्या घरी घेऊन ये. एकदा दोघांची भेट होऊन जाऊ दे. मागून होऊ दे व्हायचं ते!

आजी : छेः छेः भलतंच काय? असा थिल्लरपणा माझ्या वयाला थोडा शोभतो? भिंतीला पण कान असतात. ती येऊन भेटून गेली ही बातमी दुसरीकडून कळली तर नसता गोंधळ व्हायचा. भाऊला खरं काय ते सांगूनच पोराला आणता येतं का बघते सुचत तर काहीच नाहीए.

पमा : नाहीतर मीच भाऊला सारं सांगतो आणि घेऊन जातो आंदूला.

आजी : तू तर काहीच करू नकोस, बापा. गेल्या वेळीच भाऊच्या बायकोबरोबर वादंग झालंय् तुझं.

कल्पना : त्यांना वाटेल, तुम्ही मुद्दामच हा घाट घातला आहे.

आजी : आणि भाऊ आहे कच्च्या कानाचा. कमाचंच सांगणं खरं वाटेल त्याला

चटकन्. त्यापेक्षा माझंच सांगणं बरं राहील.

पमा : तूच ठरव आता काय करायचं ते. आम्ही निघतो.

कल्पना : हो, तेवढयात भाऊसाहेब आले तर सगळंच बिनसायचं...आणि तुम्ही मात्र तब्येतीला सांभाळा हो ! येते मी.

[ ती आणि पमा बाहेर जातात. स्कूटर चालू झाल्याचा आवाज. आजी पोथी वाचू लागतात. पण त्यांचे तिकडे लक्ष नाही. मग पोथी बंद करून त्या नुसत्या पडून राहतात.
क्षणभराने सायकलची घंटी वाजते. आनंदा शाळेतून येतो.]

आनंद : आजी, तू अशी पडून का ग ? बरं वाटत नाहीए ?...जरा पाय चेपून देऊ ?

आजी : ( त्याला जवळ घेत, त्याचा मुका घेत ) नको रे माझ्या राजा. मी आपली सहज पडले होते...शाळा सुटली तुझी ?

आनंद : हो...आई-भाऊ आले नाहीत अजून ?

आजी : नाही. आजोबांकडे मजा आली ?

आनंद : उगाच जराशी. माझ्याबरोबरचं तसं कुणीच नव्हतं ना तिथं ?...आजी, आज शाळेत काय गंमत झाली, सांगू ? माझा तो मित्र...सुरेश, तुला ठाऊक आहे ना ? त्याची आणि माझी लागली पैज.

आजी : हं...मग कोण ? तू जिंकलास ना पैज ?

आनंद : आम्ही सांगतच नाही जा. तुझं लक्षच नाहीए माझ्या बोलण्याकडे. पैज कसली वगैरे काहीच विचारलं नाहीस मला.

आजी : मन स्वस्थ नाहीए रे बाळा, माझं चल, पटकन् हात-पाय धुऊन घे. देवाला नमस्कार कर. काही खा, दूध पी.

आनंद : एवढा वेळ नाहीए हं मला. येत्या रविवारी आमची मॅच आहे क्रिकेटची. मला लगेच प्रॅक्टिससाठी ग्राउंडवर पळालं पाहिजे. मी ओपनिंग बॅटस्मन आहे, खायचं काम नाही...( आत जातो. )

( भाऊ आणि कमा येतात. )

कमा : आनंदा आला शाळेतून ?

आजी : एवढयातच ! हातपाय धुवायला गेलाय्.

कमा : रिक्षा मिळायला वेळ लागला, नाहीतर तो यायच्या आधी आम्ही पोचलो असतो...आधी त्याला खायला देते काहीतरी. नाहीतर तसाच खेळायला पळायचा. ( आत लगबगीने जाऊ लागते ) आनंदा, बाळा, आलेय् रे मी. खाल्ल्याशिवाय जाऊ नकोस बाहेर.

( आत जाते. )

भाऊ : काही होतंय् तुला, आई ?...चेहरा बरोबर वाटत नाहीए तुझा. का असाच जाऊन डॉक्टरांना बोलावून आणू ?

आजी : आल्यासारखा बसशील तरी ?

भाऊ : नाहीतर आनंदाला सांगतो डॉक्टरांना बोलवायला.

आजी : समारंभ कसा काय झाला ?

भाऊ : चांगला झाला. तू म्हटल्याप्रमाणं आहेर दिला ते योग्य झालं हो....बाकीच्या जावयांनी व्यवस्थित आहेर आणला होता. दादा-वहिनींनी चांगला आहेर केला. माईनंदेखील चांगला केला. कौतुक वाटलं साऱ्यांना.

आजी : म...मघाशी पमा येऊन गेला भेटून.

भाऊ : हो का ? दादा म्हणत होता, त्याची युनियनबाजी हल्ली जोरात आहे. त्याला एकदा सुनावणार आहे दादा.

(आतून कमा येते.)

कमा : गोळी घेतलीत आई, दुपारी ?

आजी : विसरलेच बघ.

भाऊ : (कमाला) तुला इथं देऊन ठेवायला काय हरकत होती ?

कमा : असं काय करताय ? जाताना आईजवळच देऊन ठेवली होती.

आजी : पमाशी बोलताना विसरलेच गोळी घ्यायचं.

भाऊ : पमा येऊन गेला मघाशी.

आजी : कल्पना पण आली होती.

कमा : (आजीला गोळी, पाणी देत) चहा ठेवलाय्. झाला की आणते. आनंदाला खायला बसवलाय्....(आत जाते.)

भाऊ : ही युनियनबाजी केव्हा अंगाशी येईल ते समजणार नाही पम्याला....आज कामावर गेला नव्हता ना तो ?

आजी : युनियनच्या कामाकरताच रजा घेतलीय् म्हणत होता.

भाऊ : मग तेच तर सांगतोय मी !

(आतून आनंद बॅट पॅडस् घेऊन येतो.)

आनंद : (दाराशी) आई, यायला उशीर झाला मला, तर लगेच काळजी करू नकोस.

आजी : नीट खाल्लंस तरी का पोरा ?

आनंद : हो.

भाऊ : जाताना एक काम करायचं, आनंदा. आपल्या डॉक्टरांना म्हणावं, आजीला येऊन तपासून जा जरा.

आनंद : सांगतो.

भाऊ : ग्राउंडवर जाताजाताच सांग. नाहीतर क्रिकेटच्या नादात महत्त्वाचं तेवढं विसरून जाशील.

आनंद : नाही...नाहीतर ही बॅट राहू दे इथं. मी सायकलवरून जाऊन डॉक्टरांना सांगून येतो. (जातो.)

आजी : गेला का बघ आनंदा ?

भाऊ : (बाहेर बघत) गेला...का ग ?

आजी : या पोट्टयानं नको तो घोळ घालून ठेवलाय.

भाऊ : आंदूनं ? काय केलंय तरी काय असं, त्यानं ?
(आतून कमा चहा घेऊन येते. दोघांना देते.)

भाऊ : सांग ना....इथं आहे कोण बाहेरचं ?

कमा : कशाबद्दल सांगताय ?

आजी : आद्यानं आपल्या आईला पत्र टाकून इथं बोलावून घेतलंय !

[विलक्षण स्तब्धता.]

भाऊ : (चिडून) च्यायला ! म्हणजे त्या चुगलखोर बाईनं कळवलं ते खरंच म्हणायचं.

कमा : कुणी काय कळवलं ?

भाऊ : ती शहाणी—माणकी ? गधडीनं माझ्या ऑफिसच्या पत्त्यावर उघडं कार्ड पाठवून ही बातमी कळवली होती. नशीब, तिच्या इच्छेप्रमाणं दुसऱ्या कुणाच्या हातात ते कार्ड पडलं नाही. ती मुलखाची चुगलखोर म्हणून मी मनावर घेतली नव्हती ही बातमी.

कमा : वाईट बातम्या खऱ्याच ठरायच्या !....आंद्यानं तिला इथं आपल्या घरी बोलावून घेतलंय ?

आजी : नाही. पमाकडे येतेय ती उद्या. आनंदाला भेटायला.

कमा : पमाचं मी नेहमी बघून ठेवलंय....आता सांगते तुम्हाला. या आपल्या गुणांपायीच त्याला मी मुद्दामच आमंत्रण केलं नव्हतं आजच्या समारंभाचं... त्याचे–माझे काय ग्रह आहेत, कळत नाही. यशच नाही माझ्या वाट्याला. मी इतकं जीव लावून केलं आंद्याचं, त्याचं हे फळ. अखेर वळचणीचं पाणी वळचणीलाच जाणार. तरीच मध्ये कावराबावरा दिसत होता. मी आपली यांना म्हणत राहिले की आजकाल जेवत नाही धड, तर टॉनिक तरी आणा.

आजी : तुझंसुद्धा कौतुक केलंय म्हणे पत्रातून, पोरानं. तुमचं दोघांचं प्रेम समजतंय हो त्याला. पण पोराचीच जात. मी तर म्हणते, त्या मुलीलाच पहिलं थोबाडायला हवं.

भाऊ : ती बेअक्कलच आहे, पण पम्यानं तर जाणूनबुजून केलं ना सारं? घरातच साले फितुरी करतात!

कमा : मला तर अनिष्टच वाटतंय सगळं लक्षण. आता दादांना वाटायचं, मीच नीट करत नसेन आनंदाचं.

आजी : नसतं नको घेऊस डोक्यात. त्याला कधीसुद्धा असं वाटणार नाही, मी ग्वाही देते.

भाऊ : ढुंगण धुता येत नव्हतं तेव्हापासून आपण साऱ्यांनी वाढवलं आंद्याला. त्याला सांगितला कुणी मागला इतिहास?

आजी : कुणी का असेना, मागंच आंद्या मला म्हणाला होता, की आपल्याला अगदी लहानपणापासून सारं माहीत आहे.

भाऊ : सपशेल खोटं! भुईतून वरसुद्धा आला नव्हता इथं आणला तेव्हा.

आजी : माझं तब्येतीचं गाडं ढासळतंय ते ह्याच कारणापायी हो. तेव्हा पोराची इतकी समजूत घातली मी... पण हे नवीनच उपस्थित केलंय बाबा, त्यानं.

भाऊ : त्याला तिचा पत्ता—

कमा : पमानंच दिला असणार, मी सांगते.

भाऊ : निदान हिच्या मनाला काय वाटेल याचा नको होता पम्यानं विचार करायला?...तू सांगायचंस आई, त्याला. तिला आल्या गाडीनं परत पाठव नाहीतर आमच्याशी गाठ आहे.

आजी : हो रे, पण पमाच्या घरी कुणी यावं हे—

भाऊ : त्याला आजकाल नाहीतरी जास्तीचीच शिंगं फुटलेली आहेत. युनियनमध्ये चालव म्हणावं तुझी नेतागिरी. या घरात ती नाही चालणार.

[ स्तब्धता ]

आजी : पण मी काय म्हणते—म्हणजे पटलं तर बघा हो, आता येतेच आहे ती तर होऊ द्यावी भेट.

भाऊ : हे तू बोलतेस आई? तिच्यामुळं आपल्या घराला भोगावा लागलेला सगळा मनस्ताप विसरलीस तू?...काही भेट घालून द्यायची नाही त्यांची. आता भोगा म्हणावं आपल्या कर्मांची फळं. स्वातंत्र्याची फरफरी जिरली कशी एवढ्यात? आपल्या घरात म्हणे व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होते. म्हणावं, तुझा आणि पोराचा आता काहीएक संबंध उरला नाही. आलीस तशी चालती हो.

आजी : शांत डोक्यानं ऐकून घेणार आहेस का? मागचं उगाळून आता काय होणार आहे?... तशा तेव्हा आपल्याही काही चुका होत्याच!... आणि आपण तरी किती दिवस आंदूला असा दडपून ठेवणार? उद्या गेला पळून

तर जावंच लागेल ना तिच्या दाराशी ?

भाऊ : मरण आठवलं असेल तर जाईल पळून तिच्याकडे. कृतघ्न साला !... ह्या वेळी आपल्याला नरम राहून चालणार नाही...पम्याला बोलावून घे आणि म्हणावं, आंद्याला यांतलं काही कळू न देता तिला परत पाठव.

कमा : तुम्हीच जाऊन पमाला सांगितलंत तर ?

भाऊ : हुषार आहात ! तुम्ही सुचवताय् हे ? मी तुमच्यासाठी इतकं करतोय् आणि तुम्ही म्हणताय् त्याच्याकडे जा आणि आपला अपमान करून घ्या... प्राण गेला तरी मी त्याच्या घरी या कामासाठी तरी जाणार नाही !
(एवढ्यात आनंदा येतो.)

आनंद : भाऊ, डॉक्टर भेटले नाहीत. मी कपौंडरजवळ चिठी देऊन ठेवलीय्.
(बॅट उचलतो.)

भाऊ : आणि पत्रबित्र नाही का देऊन ठेवलंस ?...आधी इकडे ये साल्या.

आजी : अरे, त्या दिवशी मी तुला काय सांगितलं होतं दाताच्या कण्या करून ?... तरी तिला तू पत्र टाकण्याचा कारभार का केलास ?
(आनंद भेदरतो. आजीला बिलगतो.)

भाऊ : चांगले फेडलेस बापाचे पांग. या घरात तुला बिस्तवावर उभं केलं होतं म्हणून तुला तिचा वडप आला ना ? गांडीला धार लागली होती तेव्हा मरणाच्या दाढेतून तुला वाचवायला कोण—ती आली होती ? आम्हीच केलं ना सारं ? आणि साल्या, पमाकाका तुला बापापेक्षा जवळचा वाटला, नाही का ?...आता का दातखीळ बसलीय् ? आजीच्या मागं लपल्यानं तुझा मार वाचत नाही, लक्षात ठेव.

आजी : लेकरावर नको बाबा आता ओरडूस. त्याला काय समज आहे का इतकी ? आलं मनात तर लिहून टाकलं.

भाऊ : दोष माझ्या नशिबाचा आहे. तिच्यापायी आधी तसा मनस्ताप भोगला. म्हटलं, आता संपलं सारं. कमानं सारं भरून काढलं. पण ह्या कार्ट्यानं आज परत खड्डयात टाकलं. काय कमी केलं मी ? कपडालत्ता, खाणंपिणं, मौजमजा...कधी उणं ठेवलं नाही....असं शेवटी ऋण फेडलं बापाचं ! नशीबच खोटं ना आपलं ? त्या पम्याला पत्ता देऊन हा घात करायची काय गरज होती ? आजपर्यंत लहान भाऊ म्हणून कौतुक केलं, त्याचं हे फळ ! आता तूच सांग, आई, येऊ दे तिला इथं ? का त्या पम्याकडे जाऊन तिची माफी मागू की 'बाई ग, फार दुःख दिलं तुला. आता भेट हो आपल्या पोराला ?'

कमा : तसं कशाला ? ठेवून घ्या परत तिला आपल्या घरात. तुमच्या पोराची

आईंच ती. मी कोण ? माझं कामच काय आता ?

आजी : काहीतरीच काय बोलावं ग तोल सुटल्यासारखं ? चार दिवसांसाठी नवऱ्याची परवानगी काढून येतेय् ती आणि तुझं आपलं तिसरंच. माणसानं अगदीच मर्यादा सोडू नये.

भाऊ : नवऱ्याच्या परवानगीनं येताहेत का त्या ? हा नवराही एक अजबच दिसतो. आता पोरासाठी म्हणून तरी का संबंध ठेवू द्यावा त्यानं आपल्या घराशी ? माझ्यासारख्यानं लाथा घालून घरात बसवलं असतं.

आजी : आता उद्या काय करायचं ते सांग. असली तुझी परवानगी तर नेते याला पमाकडे आणि भेटवून परत आणते तुझ्याकडे....कमा, पोरी जा. तोंडबिंड धू आणि देवाजवळ दिवा लाव. एकदमच घरादारावर संकट आल्यासारखं वागायला नको. आज पोरगा लहान आहे म्हणून परस्वाधीन आहे. उद्या मोठा झाल्यावर बांधून ठेवणार आहोत का त्याला ? निसर्गाच्या कायद्याविरुद्ध जाता आलंय् कधी कुणाला ? आनंदा, तू पण सगळं विसर आणि जा खेळायला. पळ.

भाऊ : आणि लक्षात ठेव. उद्या या घराचा उंबरठा जरी ओलांडलास तर उभा सोलून काढीन मी तुला !...माझा निर्णय कळला, आई तुला ?

[ आजी, आनंदा अवाक्...काळोख. ]

## दृश्य : दुसरे

[ पमाचे घर. आधीच्या दृश्याच्या दुसऱ्या दिवशी. बाहेरच्या खोलीत सुधाचे प्रवासाचे सामान. सुधा येऊन दोनेक तास झालेले.
खोलीत सुधा आणि पमा. कल्पना सुधाचे सामान आत नेण्याच्या तयारीत. पमा हसतो. ]

कल्पना : हसायला काय झालं ? वहिनींचं सामान आत नेऊन ठेवतेय्.

पमा : आता कुणाला भिऊन सुधावहिनीला लपवून ठेवू नकोस म्हणजे मिळवली.

( पमा, कल्पना हसतात. सुधा किंचित् स्मित करते.
कल्पना सामान आत नेते. )

तू जरा आराम कर आता. प्रवासात धड झोप मिळाली नसेल.
( कल्पना बाहेर येते. )

सुधा : माझ्या झोपेचं नाही रे कौतुक. त्याचं पत्र आल्यापासून माझी झोपच उडालीय्.

कल्पना : मघाशी धड जेवलाही नाहीत.

पमा : ( चेष्टेने ) तुझ्या स्वयंपाकाला काय चव असते ?

सुधा : पुरे रे, स्वयंपाक खरंच छान केला होता पोरीनं. पण माझं चित्तच नाहीए जागेवर.

[ स्तब्धता. ]

सुधा : बरं, इथली काय हालहवाल ?

पमा : कसली हालहवाल ? तुला तर माहीतच आहेत साऱ्यांचे स्वभाव. कुणामध्ये थोडाच काही बदल झालाय् ?...पण हे बघ, परिस्थिती कितीही बिकट असली तरी कुणी इथं येऊन काही म्हणू शकत नाही तुला, मी घरात असे-पर्यन्त. तू गेल्यावर मग माझं मी निपटत राहीन.

कल्पना : आता वाटतंय, घरी साऱ्यांना विश्वासात घेण्यासाठी आपण प्रयत्न केला तो मुळात चुकलाच. आनंदाला गुपचूप आणून भेटवलं असतं आणि मागाहून निस्तरलं असतं होईल ते.

पमा : एवढा काळ बदलला, पण जुने पीळ कायमच ठेवलेत या लोकांनी ! त्या कमावहिनीनं रडून रडून उत्पात केला म्हणे. काय गरज होती त्याची ?

सुधा : तुला कुणी सांगितलं हे ?

पमा : युनियन चालवतोय् मी ! सकाळी सहज असा मी माईताईकडे चक्कर टाकून आलो. तिथं भाऊ येऊन सुलूवर आग पाखडून गेला होता ना ? माईताईनं मला इत्थंभूत हकीकत मोठ्या चवीनं ऐकवली. ( हसतो ) आणि नंतर मला सुनवलंदेखील.

कल्पना : कमावहिनी करणारच उत्पात. आधी तुमच्यावर राग होताच. शिवाय इतकी वर्षं त्यांनी आंद्याचं सगळं केलंय्...

पमा : चूप ग ! तू आमच्या घरात यायच्या आधीच्या गोष्टी तुला माहीत नाहीत. करायसवरायच्या काळात आनंदा या सुधावहिनीकडेच होता. आमच्या घरी आणला तेव्हा काही बाळंती धुवावी लागत नव्हती. त्या दिवसांत आम्ही सारे एकाच जागेत राहात होतो. त्याच्या संगोपनाला आमचा सगळ्यांचाच हातभार लागला होता....मला एवढंच म्हणायचंय् की कमावहिनी सारखं 'मी केलंय्, मी केलंय' असं तुणतुणं वाजवून उगाच सीन निर्माण करू नये.

कल्पना : इथं काय बोलायचं ते बोला. उद्या साऱ्यांच्या देखत काही बोलू नका

सगळे संबंध तुटून जातीलही आणि आईच्या जीवाला नसतं दुःख गिळत बसावं लागेल. तिकडे तर वणवेच पेटले असतील एकेक, दादासाहेबांच्या, भाऊसाहेबांच्या घरात.

[ स्तब्धता. ]

सुधा : पमा, तुला सांगू ? त्यापेक्षा मला कुठल्यातरी परतीच्या गाडीत बसवून दे. आनंदाला समजावून सांग. म्हणावं, आपल्या नशिबात काही भेट नाहीए, बाळा. ( हुंदका ).

कल्पना : आता आला आहात इतक्या लांबून आणि भेट न घेता निघून गेलात तर कुणाला तरी चैन पडेल का आपल्याला ?

पमा : अरे, पण निस्तरणारा मी आहे ना ? मला तर समजत नाहीए, की असं कुठलं सालं आकाश कोसळलंय घरादारावर ते ! एक एवढंसं पोरगं सगळ्या कुटुंबाला छकवू शकतंय...कमाल आहे !

सुधा : मी इथं येण्याची घाईच केली असं आता वाटतंय. तुला इथली परिस्थिती कळवण्याची सवड द्यायला हवी होती. इतकी वर्षं सोसलं तसं आणखी सोसलं असतं.

पमा : आता माझ्यावर सारं सोपव आणि शांत राहा बघू. ( पायात चपला सरकवत ) आणि मी येईपर्यंत विश्रांती घे.

कल्पना : तुम्ही बाहेर कुठं—

पमा : अंहं. विचारू नकोस ! कामं व्हायला हवी आहेत. युनियनची एक अर्जंट मिटिंग निघालीय् ती आटपून थेट भाऊकडे जाणार आणि आंद्याला घेऊनच येणार इथं.

कल्पना : जाताना देवाला गाऱ्हाणं घालून तरी निघा, म्हणते मी.

पमा : बारा वर्षं गाऱ्हाणीच ऐकत आलाय् देव सुधावहिनीची. आता पुन्हा कशाला छळू त्याला ? 'हा' जाऊन 'हा' परत येतो बघ त्याला घेऊन...ऑल द बेस्ट. ( बाहेर जातो. स्कूटरचा आवाज. )

कल्पना : माझ्या उरात तर धडकीच भरलीय्. जमदग्नीचाच अवतार एकेकाचा ! मागं मीनाच्या लग्नाच्यावेळी हे तुमच्या घरी येऊन गेले तर केवढं रण माजवलं एकेकांनी. भाऊसाहेब काही दिवस इकडे आले पण नाहीत. त्यात आता ही नवी भर पडणार.

सुधा : आईचं काय मत आहे ?

कल्पना : त्या असणार आनंदाच्याच बाजूनं हो, पण त्यांचं कुणी ऐकलं तर ना या बाबतीत ? काल रात्री दादासाहेबांनी ह्यांना तंबीच दिलीय्. तुम्हाला दुसऱ्या ट्रेननं परत पाठवलं नाहीतर पाहून घेईन, म्हणून. सगळ्या कुटुंबावर त्यांचा

दारारा ना ?

सुधा : पमाला आणि तुला मी नाहक संकटात टाकलं बघ....का अशीच जाऊ मी आल्या पावली परत ? तुम्हाला माझ्यापायी झळ लागायला नको नसती.

[ कल्पना गांगरते. उगाच उठून दाराशी जाते. ]

कल्पना : ह्यांना तरी येऊ दे परत. मग काय होतंय् ते पाहून ठरवू आपण.

सुधा : काय होणार ते कळत नाहीए ? आग पसरलीय् तिचा डोंब उसळणार...

कल्पना : जरा वाट बघू ह्यांची. ( पुन्हा काही न सुचून दाराशी जाते. बाहेर बघते. रिक्षा थांबल्या–गेल्याचा आवाज ... एकदम दचकून ) अरे देवा, माझ्या !

सुधा : काय ग, काय झालं ?

कल्पना : भाऊसाहेब आणि कमावहिनी ! दोघंही बरोबर येताहेत ... आणि हे नेमके घरात नाहीत. आता ?

[ दोघी पूर्ण गांगरतात. भाऊ आणि कमा येतात. काही क्षण तणावाचे...]

चु...चुकामुक झालेली दिसते. हे तिकडेच ... आपल्याकडेच गेलेत .. ब.... बसा...बसा नं....चहा.... चहा ठेवू ? चालेल ना थोडा ?

भाऊ : चहा प्यायला आलेलो नाही मी, कल्पना. जाब विचारायला आलेय् पम्याला. कुणाशी सल्लामसलत न करता हा लांडा कारभार करायला कुणी सांगितलं. होतं त्याला ? मी जिवंत आहे अजून माझ्या पोराचं भलंबुरं बघायला.

सुधा : पमाचा काहीसुद्धा दोष नाहीए यात. त्याच्या संमतीची वाट न बघता मीच निघून आलेय् इथं.

भाऊ : शहाणपणा झाला का फार ? असं करताना थोडा मागचापुढचा विचार तरी करायचा होता ! केवढा मनस्ताप झालाय् सगळ्यांना ! निदान आमच्या म्हाताऱ्या आईचा तरी विचार करायचा होता ! आता आम्ही तिच्या तब्येतीचा विचार करणार का त्या कार्ट्याला सांभाळणार ?

कमा : चांगलाच बेईमान निघाला ग बाई पोट्टा !

सुधा : असं नका बोलू तुम्ही तरी. कुणाला दुखवायच्या हेतूनं नाही केलं हे त्यानं. मी तर नुसता जन्मच दिलाय् त्याला, पण बाकी सारं तर— त्याचं मला आलेलं पत्र तुम्ही वाचलंत ना, तर समजेल तो किती मानतो तुम्हाला ते.

भाऊ : मानलं असतं तर हा तमाशा केला नसता त्यानं. केवढा घोर होणार आहे ह्यापुढं आमच्या जीवाला. त्याला अक्कल नाही, पण तुम्हाला तर समज असायला हवी होती ! स्वतःला हुषार, विचारवंत समजणाऱ्या तुम्ही !.... तुम्हाला धरून परवानगी मिळालीच कशी म्हणतो मी ? मला तर कींवच येते अशा माणसांची !

सुधा : त्यांची कींव करायचं कुणाला कारण नाही ! पुरुषार्थाच्या ह्या घराच्या आणि

त्यांच्या कल्पनेमध्ये जमीन–अस्मानाचं अंतर आहे! जे काय बोलायचं असेल ते मला बोलावं.

भाऊ : तेच बोलतोय्! आता एकमेकांच्या नावानं आंघोळी केल्यानंतर ह्या घरात यायची हिंमतच कशी झाली तुमची?

सुधा : पोराचं पत्र वाचल्यानंतर हा प्रश्न विचारावासाच वाटणार नाही. कल्पना, दे त्याचं पत्र पमानं कुठं ठेवलंय् ते.

कमा : मी म्हणते, एकदम आला तरी कुठून ह्याला पुळका? आजवर तर कधी नाव घेतलं नाही. चांगला खातपीत होता. मला आई–आई करत होता. पण इतका कृतघ्नपणा करील असं मनातदेखील आलं नाही.

सुधा : तसं नाही म्हणता यायचं. तुमचं प्रेम मिळूनही आतून तो मला आठवत होता. धाकानं बोलून दाखवत नव्हता म्हणून काय झालं?

भाऊ : खोटं आहे. सपशेल खोटं आहे! मी सांगतो, काहीतरी बनावटी घाट घातलेला आहे हा. अगदी खोटं बोलतोय् साला!... पण ... पण तुम्ही येण्यापूर्वी दहा वेळा विचार करायला हवा होता. आता संबंध तुटले. मार्ग बदलले. त्यानं लिहिलं म्हणून काय असं धावायची गरज होती?....आमचाच दाम खोटा म्हणायचा....नाहीतर हा दिवस कसा दिसला असता?

(सुधा रडू लागते.)

कल्पना : ह्यांची तरी कमाल झाली. गेले ते गेलेच.

भाऊ : त्याला मी बघून घेईनच. जातो आता. पण त्याला मात्र मला भेटायला सांग. मी घरीच आहे आज. हिची मनःस्थिती ताळ्यावर येत नाही तोपर्यंत कामावर जायला पाय थोडाच निघणार आहे माझा! रात्रभर रडत होती. तिच्या सॅक्रिफाईसची किंमत मला तर ठेवायलाच हवी ....आता यापुढं त्या पोराला सांभाळणं आमच्यासाठी किती कठीण जाईल ह्याची थोडी तरी कल्पना यायला हवी होती तुम्हाला. तुम्ही शिकलेल्या ... स्वतःला सुधारक म्हणवणाऱ्या....व्यक्तिस्वातंत्र्याच्या पोकळ गप्पा मारताना दुसऱ्या लोकांच्या भावना जाणायला नकोत तुम्ही?

सुधा : सुचलंच नाही हो मला तेवढं.

कमा : पुरे झालं! चला बघू आता इथून....इथं थांबून तरी काय निष्पन्न होणार?... पमाला सांग, कल्पना. म्हणावं, उद्या पोरगा भरकटला तर मी जबाबदार नाही! माझं कर्तव्य मी केलंय्...

(दोघे जायला निघतात. सुधा रडू लागते.)

सुधा : (रडतच) एकदा...एकदा पाठवलं असतं त्याला.... एवढं म्हणतोय् तर..

(कमा बाहेर पडते. तिच्यामागून भाऊ.)

(असहायपणे) जरा एक मिनीट थांबा. मला आपल्याशी एकट्याशी बोलायचंय् थोडं.
(भाऊ गोंधळतात. मग–)

भाऊ : (कमाला) थांबा जरा.

कमा : (तरातरा जात) जा....जा ना, समजवा! मी निघते घरी.

कल्पना : (कमाचा हात धरून) असं नका करू. आपण दोघी बाहेर थांबू. बोलून घेऊ दे त्यांना थोडा वेळ.
(भाऊ वळतात. सुधापुढे उभे.)

भाऊ : आता काय राहिलंय् ?

सुधा : (गदगदून रडते. मग—) जाते मी परत, त्याला न भेटताच.... आणि वचन देते, ह्यापुढं परत कधी आयुष्यात त्याला तोंड दाखवणार नाही. पण तुम्हीसुद्धा मला एक वचन दिलं पाहिजे आज–

भाऊ : हं....

सुधा : द्याल ना ?

भाऊ : मी... मी त्याला नीट बघत नाही असं नका वाटून घेऊ. तो अगदी आनंदात असतो माझ्याजवळ. काळजी करू नका. त्याला नीट सांभाळण्याचंच वचन हवंय् ना तुम्हाला ?

सुधा : तें नाही हो ! तुम्ही तर सारी सांभाळताच आहात त्याला. तो तुमच्याकडेच वाढणार आहे, पण मला काय ? अशीच झुरत झुरत मी हा जन्म काढून घेईन...लगेच्चच मरणार असं नाही म्हणत मी. नशिबीचे भोग पूर्ण होतील तेव्हा येईलच मरण...पण,...पण मी मेल्यानंतर त्याला पाठवाल माझ्याकडे ? त्याच्या हातून मला अग्नी तरी मिळू द्या....म्हणजे निदान पुढल्या जन्मी शांतता मिळेल माझ्या आत्म्याला... देता... देता एवढं वचन ? पोरासाठी एवढी भीक... (भाऊंचा हात हातामध्ये ओढून घेते. त्यावर डोके ठेवते.)

भाऊ : (दुसऱ्या हाताने तिचे डोके थोपटतात) उगाच नसते विचार करून त्रास करून घेऊ नका. उद्याचं कुणी बघितलंय् ? (हात सोडवून घेतात) मी निघतो...शांत व्हा आणि त्याची एवढीदेखील काळजी करू नका. (रुमालाने नाक पुसत बाहेर जाऊ लागतात. मग) आम्ही निघतो, कल्पना. पम्याला मला भेटायला सांग. विसरू नकोस. (कमाला) चला.
(कमा आणि भाऊ जातात. सुधा रडता रडता कोसळते.
काही क्षण स्तब्धता...मग उठते. कल्पना पूर्ण गांगरलेली.)

कल्पना : किती त्रास करून घ्याल स्वतःला ?...काही गोष्टी आपल्या हाती नसतातच.

नाहीतर हे तिकडे जायला आणि भाऊसाहेबांनी इकडे यायला एकच वेळ कशाला यावी ?.... मी थोडी कॉफी करून आणू का ? बरं वाटेल बघा.

सुधा : (स्वतःशीच असे) माझंच चुकलं...अपेक्षा ठेवली की अपेक्षाभंग ठेवलेलाच असतो. कल्पना, पमानं इतकं केलं माझ्यासाठी. त्याचे उपकार मला कधी विसरताच येणार नाहीत... त्याला सांग सगळं झालेलं. (आत जाऊन बॅग, पिशवी आणते) मी निघते आता. (पर्स उघडत) जमलं असतं तर पोराला बाजारात नेऊन त्याच्यासाठी बॅट घेणार होते चांगली. (पैसे देत) पमाला हे पैसे दे. म्हणावं, सहज शक्य असेल तर बॅट घेऊन दे त्याला. तूच दिली आहेस असं सांगून...नाही जमलं तर एकाद्या अनाथाश्रमाला पैसे देऊन टाक हे... मी निघते. स्टेशनवर जाऊन बसून राहीन...येईल तेव्हा येऊ दे गाडी.

कल्पना : असं काय करता ?...निदान त्यांना येऊ दे. आल्यावर तुमची भेट झाली नाही तर दुःख होईल त्यांना.

सुधा : भेट न झाल्याचं दुःख तू मला सांगतेस ?... त्याला म्हणावं, न झालेल्या दुसऱ्या एका भेटीचं जे दुःख मी घेऊन जातेय् ते तुझ्या दुःखापेक्षा कितीतरी मोठं आहे ! निघते मी. आज पहिल्यांदाच आणि शेवटची अशी आले मी इथं.

कल्पना : मी येऊ स्टेशनपर्यंत सोबत ?

सुधा : नको. जाईन मी एकटी. आता तसा काय संबंध ग तुमचा-माझा ?

कल्पना : माझ्यासाठी म्हणून तरी कॉफी घेऊन चला... प्लीज...

सुधा : नको.

(सुधा सामानाजवळ बसून राहते. निघणार इतक्यात पमा येतो. वैतागलेला.)

पमा : इथं येऊन गेला ना भाऊ ? सालं आपलं नशीबच असं. जाताना तू विचारलंस ना कुठं जाताय् म्हणून ? नाट लागला सगळ्याला. युनियनच्या ऑफिसला जाताना वाटेतच पाठक भेटला. म्हणाला, तुझ्याकडे राजीनामा मागणार आहेत सगळे. त्यांच्यासाठी मी स्वतःला तोशीस लावून घेतली. प्रमोशन नको म्हटलं, घराकडे दुर्लक्ष केलं आणि हे हरामखोर साले उफराटे फिरले. डोकंच गेलं माझं. पाठकला म्हटलं, त्यांना सांग; उद्या राजीनामा खरडून पाठवतो तो घ्या आणि मरा साल्यांनो !...त्याच सणकीत मग भाऊकडे गेलो. तर आई म्हणाली, दोघं बाहेर गेली आहेत. आनंदा कुठं आहे तर काही बोलली नाही. नुसते अश्रू गाळायला लागली... म्हटलं, ही दोघं इथंच टपकली असणार येऊन काय म्हणाला काय भाऊ ? पोराची भेट घालून

IRBK-0122445

द्यायची नाही ?

सुधा : जाऊ दे. झालं गेलं गंगेला मिळालं. मी निघतेय् आता.

पमा : नाही ! तू जायचं नाहीस पोराची भेट झाल्याशिवाय. मी असाच जातो त्याच्याकडे आणि आंग्राला उचलून आणतो की नाही, पाहाच तू. युनियनची गुंडगिरी कधी वापरली नाही, ती वापरून टाकतो एकदा. दाखवतोच त्यांना माझा इंगा.

कल्पना : झालं एवढं बास नाही का झालं ? भाऊसाहेब तुम्हाला काय दाद देतील वाटतंय् ? पोराविरुद्ध रान उठलं असेल तिकडे. तुम्ही जाल आणि—

सुधा : तुझ्या पाया पडते मी ! केलंस एवढं खूप केलंस. आता आणखी हात पोळून घेऊ नकोस. यातून शत्रुत्वाखेरीज काहीही हाती लागणार नाही आणि आईची तब्येत बिघडली तर वर आणखी जन्मभराचा पश्चात्ताप पदरी बांधून घ्याल दोघं.

पमा : मी आता माघार घेणार नाही. बघच तू.

सुधा : तुला सगळं कळलेलं नाहीए अजून इथं काय झालं ते ... अरे, दगडावर डोकं आपटणंच ठरणार आहे ते. माझं ऐक. आपल्या हाती काहीएक उरलेलं नाहीए. मी निघाले. सांभाळून राहा एकमेकांना.

(हातात बॅग घेऊन निघते—
इतक्यात आजी बाहेरून येतात. त्यांच्यामागे आनंद लपलेला. कावराबावरा. भाऊ बाहेर उभे.)

आजी : कुठं चाललीस ?

(सुधा दचकून बॅगेवरच कोसळते.)

आजी : बघ कोण आलंय् तुला भेटायला. (आनंदाला पुढे आणत) आनंदा, जा बापा भेट...भेट जा आपल्या आईला. बघ काय दशा करून घेतलीय तिनं तुझ्या भेटीपायी.

(सुधा हात पसरते. आनंद तिच्याकडे धावत जातो. तिच्या कुशीत शिरतो.)

आनंद : आई ... आई, मी आलोय बघ तुला भेटायला. भाऊंनीच आणलंय मला.

पमा<br>कल्पना } : भाऊंनी ?

(सुधा आनंदाला मिठीत घेते. त्याचे पटापटा मुके घेऊ लागते सर्वांचे डोळे भरलेले.)

[ तिसरा अंक समाप्त ]

वाचनालय शाखा.
प्र. क्र.
नों. दि.